follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 ✲ वर्ष २५ ✲ अंक २५१ ✲ सातारा ✲ शुक्रवार ✲ दि. २४ मे २०२४ ✲ पाने ८ ✲ किंमत ५ रू/



# भीषण स्फोटाने डोंबिवली हादरली !

## सहा जणांचा मृत्यू, ४८ जखमी

**मुंबई :** एमआयडीसीतील कंपनीत बॉयलर स्फोट होऊ लागलेल्या भीषण आगीत आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाला आहे यामध्ये दोन महिलांचा समावेश आहे. तर ४८ जण जखमी झाल्याची माहिती मिळत असून जखमींचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. जखमींना नजीकच्या रूग्णायात उपचार सुरू आहेत या स्फोटाने पून्हा एकदा डोंबिवलीकरांच्या सुरक्षेचा प्रश्न चव्हाटयावर आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घटनेची तातडीने दखल घेत अधिका-यांना सुचना दिल्या,

डोंबिवली एमआयडीसीतील फेज २ मधील सोनारपाडा येथील मे अमुदान या केमिकल कंपनीत दुपारच्या सुमारास अचानक बॉयलरचा स्फोट झाला हा स्फोट इतका मोठा होता की स्फोटाने आजूबाजूच्या परिसरातील इमारती हादरल्या ऑफीसच्या आणि घरांच्या काचा फुटून खाली पडल्या. मोठा आवाज झाल्याने नागरिक भयभीत झाले रस्त्यावरील नागरिकांनी पळ काढला. स्फोटानंतर धुराचे आणि आगीचे लोट हवेत पसरले. या आगीने काही क्षणातच रौद्ररूप धारण केल्याने आजूबाजूच्या तीन ते चार कंपन्यांपर्यंत ही आग पसरली मागील बाजूस असलेल्या कारच्या शोरूमला ही आग लागली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले. या स्फोटाने डोंबिवली हादरून गेली असून या मध्ये जिवीत आणि वित्तहानी झाली आहे.

स्फोटाची तीव्रता भीषण असल्याने डोंबिवलीतील रहिवाशी इमारतीच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या, तर परिसरातील दुकानांच्या काचा फुटून रस्त्यावर पडल्याचं दिसून आलं. या बॉयलरच्या स्फोटाचा आवाज ३ ते चार किलोमीटरपर्यंतचा परिसर हादरून गेला. अग्निशमन दलाकडून अतिरिक्त कुमक मागवून आग विझविण्याचे शर्थीचे प्रयतन सुरू आहेत आग भीषण असल्याने अग्नीशमन दलाच्या जवानांना आग विझवताना अडथळा येत आहे धुराच्या प्रचंड लोटमुळे त्यांना आत शिरणेही मुश्किल झाले होते. आगीची तीव्रता मोठी असल्याने अंबरनाथ कल्याण आजूबाजूच्या परिसरातू अग्निशमन दलाच्या गाडया घटनास्थळी रवाना झाल्या आहेत.

**नऊ वर्षांपूर्वीच्या स्फोटाची आठवण**

१६ मे २०१६ रोजी डोंबिवलीत प्रोबेस कंपनीत स्फोट होऊन १२ जणांचा मृत्यू झाला होता तर दोनशे वर नागरिक जखमी झाले होते. नागरिकांच्या करोडो रुपयांचे मालमत्तेचे नुकसान झाले होते. आज तिच पुनरावृत्ती डोंबिवली एमआयडीसी फेज दोन मधील अंबर केमिकल्स मध्ये स्फोट होवून झाली आहे. त्यावेळी प्रोबेस स्फोटाची चौकशी समिती नेमली होती. तो अहवाल जनतेसमोर आणण्यात आलाच नाही आणि त्यातील सूचनांची अंमलबजावणी करण्यात आली नाही. आता पुन्हा तेच तेच चौकशा समित्या नेमली जाणार का ? प्रोबेस स्फोटातील नुकसान झालेल्या मालमत्ता धारकांना आणि काही जखमी होऊन जायबंदी झाले होते त्यांनाही अद्याप नुकसान भरपाई मिळाली नाही आहे.

आज झालेल्या स्फोटाने अनेक इमारतींचे नुकसान झाल्याचे समजले आहे. इमारतींना स्फोटाचा वेळी मोठे हादरे बसले. एमआयडीसी फेज मधील म्हात्रे पाडा, रिजेंसी इस्टेट, एमआयडीसी निवासी, सोनार पाडा इत्यादी भागात नुकसान झाले आहे. सदर भागात काही लोखंडी भागांचे अवशेष पडल्याचे दिसत आहे.

स्फोट झालेल्या परिसरातील नागरिक भयभयीत झाले असून असे काही महिन्याच्या अंतराने दुर्घटना होत असल्याने नागरिकांचा सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. एमआयडीसी मधील अती धोकादायक कंपन्या त्वरित येथून हलविण्यात याव्यात ही येथील जनतेची मागणी आता तरी पूर्ण करा अशी मागणी स्थानिक कार्यकर्ते राजू नलावडे यांनी केली.

### परिस्थिती नियंत्रणात : मुख्यमंत्री शिंदे

**कंपनीतील बॉयलरचा स्फोट झाला या घटनेनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. कंपनीत बॉयलरचा स्फोट झाला त्यानंतर आग लागली. जिल्हाधिका- यांशी चर्चा केली आहे बचाव पथके घटनास्थळी पोहोचली आहेत सर्वच यंत्रणा पोहचली आहे सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली होती.**

### चौकशी करणार : रविंद्र चव्हाण

**स्थानिक आमदार आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण म्हणाले डोंबिवली स्फोटाची घटना अतिशय गंभीर आहे या स्फोटामुळे जखमी झालेल्या रूग्णांवर होणा-या उपचारांना यश यावे अशी प्रार्थना आहे ही आग विझविण्याचे प्रयत्न सुरू आहेत याबाबत प्रशासनाला योग्य त्या सूचना दिल्या आहेत. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल.**

### डोंबिवलीची घटना वेदनादायक : फडणवीस

**डोंबिवलीच्या स्फोटानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्रफडणवीस यांनी ट्विट करीत दु:ख व्यक्त केले आहे या आगीत आठ जण अडकले होते त्यांना बाहेर काढण्यात आलं आहे जखमींच्या उपचाराची व्यवस्था करण्यात आली असून रूग्णवाहिका सज्ज ठेवण्यात आल्या आहेत जिल्हाधिका-यांशी माझी चर्चा झाली असून एनडीआरएफ टीडीआरएफ अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आलं आहे जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी अशी प्रार्थना करतो असं गृहमंत्री फडणवीस यांनी म्हटलं आहे.**

# डोंबिवलीतील धोकादायक केमिकल कंपन्या

## ४ जूननंतर स्थलांतरीत करणार : उदय सामंत

**डोंबिवली :** एमआयडीसीतील केमिकल कंपनीत झालेल्या स्फोटानंतर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. एमआयडीसी परिसरातील धोकादायक कंपन्या स्थलांतर करण्याची मागणी डोंबिवलीकरांनी अनेक दिवसांपासून लावून धरली होती मात्र आचारसंहिता असल्यामुळे हे काम थांबलं होतं ४ जूननंतर केमिकल कंपन्या शिफ्ट करण्याची प्रक्रिया सुरू होईल असे सामंत यांनी सांगितले.

सामंत म्हणाले, डोंबिवलीतील सर्व धोकादायक कंपन्या शिफ्ट करण्यात येणार आहे वर्षभर यावर काम सुरू आहे जागा शोधण्यात आली आहे मात्र अद्याप जागेचे वाटप करण्यात आलेलं नाही डोंबिवलीकरांच्या मागणीवर धोरणात्मक निर्णय घेतला आहे त्यासाठी अंबरनाथ परिसरात शेकडो एकर जागा घेण्यात आली असल्याचं सामंत यांनी सांगितलं

कंपनीतील आग आटोक्यात आली असून सहा मृतदेह सापडल्याची माहिती त्यांनी दिली. दुर्घटनेतील सर्व जखमींचा खर्च सरकार उचलणार आहे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तसं जाहीर केलं आहे मात्र घटना दुदैवी आहे या कंपन्यांमध्ये नियमबाह्य काही झालं आहे का ? याची तपासणी करण्याच्या सूचना अग्निशमन दलाला दिल्या आहेत तसंच या घटनेची सखोल चौकशी करण्याचीही मागणी केली आहे यात कोणी दोषी आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

अतिधोकादायक रसायनं तयार करणाऱ्या कंपन्या शहराच्या बाहेर नेल्या जाव्यात अशी मागणी स्थानिकांकडून केली जाते आहे.

आम्ही यासंदर्भात पुढच्या आठवड्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याशी आम्ही चर्चा करुन याविषयीचा निर्णय घेऊ. येत्या सहा महिन्यांत इथल्या अतिधोकादायक केमिकल तयार करणाऱ्या कंपन्या शहराबाहेर कशा नेता



येतील यावर आम्ही लक्ष केंद्रीत करणार आहोत. असं श्रीकांत शिंदेंनी म्हटलं आहे.

या दुर्घटनेत ३० जण जखमी झाले असून त्यांना एम्समध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे सर्व जखमींना मदत करण्यात येणार आहे असे श्रीकांत शिंदे यांनी सांगितल.

# प्रवरा नदीत एनडीआरएफ पथकाची बोट उलटली; तीन जणांचा मृत्यू

### शोध मोहिम सुरु असताना घडली घटना



**अकोले :** प्रवरा नदीत बुडालेल्या युवकाचा शोध घेण्यासाठी आलेल्या नाशिक येथील आपत्ती व्यवस्थापन पथकाची बोट आज सकाळी उलटून या पथकातील चार जणांसह एकूण पाच जण प्रवरा नदी पात्रात बुडाले. यातील तीन जणांचे मृतदेह सापडले असून अन्य दोन जणांचा शोध सुरू आहे. बुधवारपासून याठिकाणी झालेल्या अपघातात एकूण चार जण बुडून मृत्यू पावले असून बुडालेल्या अन्य तिघांचा अद्याप पर्यंत शोध लागलेला नाही.

काल बुधवारी दुपारी अकोले तालुक्यातील सुगाव बुद्रुक येथे प्रवरा नदी पात्रात पोहण्यासाठी गेलेले सागर पोपट जेडगुले (वय २५ रा. धुळवड, ता सिन्नर) व अर्जुन रामदास जेडगुले (वय १८ ,रा .पेमगिरी, तालुका संगमनेर) हे दोघे तरुण बुडाले होते. त्यातील सागर जेडगुले याचा मृतदेह कालच सापडला तर अर्जुन जेडगुले याचा शोध सुरू होता, पण काल त्याला यश आले नाही.

या तरुणाच्या शोध घेण्यासाठी नाशिक येथील आपत्ती व्यवस्थापनाचे पथक आज सकाळी घटनास्थळी दाखल झाले. या तरुणाचा तपास सुरू असतानाच शोध पथकाची बोट उलटून पथकातील चार व स्थानिक युवक गणेश मधुकर देशमुख (वय -३७, रा.सुगाव बुद्रुक )असे पाच जण बुडाले. यातील तिघांचा बुडाल्यामुळे मृत्यू झाला आहे. बुडालेल्या पैकी प्रकाश नामा शिंदे, वैभव सुनील वाघ व राहुल गोपीचंद पावरा (सर्व रा. धुळे) या तिघांना बाहेर काढण्यात यश आले.

दरम्यान, या सर्वांना पुढील उपचारासाठी अकोले येथील डॉ भांडकोळी हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते मात्र या तिघांनाही वाचविण्यात डॉक्टरांना यश आले नाही. तर वाचिवलेल्या पंकज पंढरीनाथ पवार (वय -३३, रा.धुळे) या चौथ्या तरुणावर प्रारंभी अकोले ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. त्याची प्रकृती स्थिर असली तरी त्याला अंडर मेडीसीन ठरण्यासाठी डॉ भांडकोळी हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले आहे.

सुगाव बुद्रुक येथे प्रवरा नदी पात्रातील पाझर तलावामधून पडणाऱ्या पाण्याचा दाब अधिक असून तेथे भोवरा असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे ही दुदैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान घटनास्थळी माजी मंत्री आमदार बाळासाहेब थोरात ,आमदार डॉ किरण लहामटे,माजी आमदार वैभवराव पिचड यांनी घटनास्थळी भेट दिली. स्थानिक नागरिकांसह अकोले तालुक्यातील नागरिकांनी परिसरात मोठी गर्दी केली आहे.

# उजनीतील सर्व ६ जणांचे मृतदेह सापडले

**पुणे :** उजनी जलाशयात दोन दिवसापूर्वी प्रवासी वाहतूक करणारी बोट बुडाली आणि गेली सुरु असलेली शोध मोहीम तिसऱ्या दिवशी सकाळी संपली. या ठिकाणी बुडालेल्या सर्व सहा जणांचे मृतदेह हाती लागले असून त्यामुळे झरे आणि कुगाव या गावात फक्त आक्रोश आणि सुन्न करणारे हुंदके दिसत आहेत.

मंगळवारी संध्याकाळी कुगाव ते काळाशी या उजनी जलाशयातील जलवाहतूक करणारी बोट माढ्यातच गेल्यावर आलेल्या वादळात बुडाली. या बोटीत सात जण प्रवास करत होते. मात्र वादळाने बोट बुडू लागताच राहुल डोंगरे या पोलीस अधिकाऱ्याने पाण्यात उडी मारून पोहत कळाशीचा काठ गाठला आणि ग्रामस्थांना याची माहिती दिली. त्यानंतर मंगळवारी संध्याकाळपासून या शोध मोहिमेला सुरुवात झाली होती. बुधवारी सकाळी एनडीआरएफची टीम दाखल झाली आणि युद्ध पातळीवर शोध मोहीम सुरू झाली. मात्र बुधवारी संध्याकाळी तपास काम थांबवताना हाती एकही मृतदेह लागला नव्हता.

गुरूवारी सकाळी पुन्हा नव्या दमाने एनडीआरएफची टीम आणि स्थानिक मच्छीमारांनी शोधला सुरुवात करताच पहिल्यांदा लहान मुलाचा मृतदेह फुगूनवर आल्याचे दिसून आले. यानंतर कुगक तिराकडील इनामदार वाड्याच्या जवळ एका पाठोपाठ पाच मृतदेह टीमला हाती लागले. यामध्ये झरे येथील झांधव कुटुंबातील गोकुळ जाधव, त्यांची पत्नी कोमल, दीड वर्षाचा मुलगा शुभम व सहा महिन्याची मुलगी माही यांचे मृतदेह मिळाले.

त्याच्या जवळच बोट चालक अनुराग अवघडे याचा मृतदेह सापडला. मात्र शेवटचा गौरव डोंगरे याचा मृतदेह सापडला नव्हता. पुन्हा गौरवच शोध घेताना दोन तासांनी थोड्या लांब अंतरावर गौरव डोंगरे हा शेवटचा मृतदेह देखील सापडला. प्रशासनाने सुगाव काठाला पाच ऍम्ब्युलन्सची व्यवस्था करून ठेवली होती. हे सर्व मृतदेह काठावर आणताच तातडीने त्यांना ऍम्ब्युलन्समधून करमाळा उपजिल्हा रुणालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले.

मृतदेह सापडल्याची बातमी करमाळा येथे पोचताच मोठ्या संख्येने मृतांचे नातेवाईक उपजिल्हा रुणालयात दाखल झाले. आणलेले मृतदेह तातडीने शवविच्छेदनासाठी घेण्यात आले. दोन दिवसानंतर मृतदेह सापडल्याने मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली होती. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून करमाळा प्रांताधिकारी आणि तहसीलदार या सर्व प्रक्रिया सुरु असताना उपजिल्हा रुणालयात उपस्थित होत्या.

मृतदेह शवविच्छेदनासाठी नेल्याची माहिती कुगाव व झरे या दोन गावात समजल्यावर गावात शोककळा पसरली. गेली दोन दिवस झरे व कुगाव ग्रामस्थ विविध माध्यमातून शोध मोहिमेच्या मदतीसाठी धावत होते. काल दिवसभरात या दोन्ही गावात चुली देखील पेटल्या नव्हत्या. प्रत्येकाला आशा होती मात्र आज सकाळी मृतदेह हाती लागल्याची खबर येताच सर्वांचाच धीर सुटला. गोकुळ जाधव यांचे संपूर्ण कुटुंब यात मृत्यू पावल्याने झरे गावात आज सकाळीपासून शेकडो ग्रामस्थ गोकुळ जाधव यांच्या घराजवळ जमा झाले होते.

सर्वत्र फक्त आक्रोशाची आवाज आणि सुन्न करणारे हुंदके असे वातावरण बनले होते. झरे येथील गोकुळ जाधव हे प्लम्बिंगचे काम करीत असत . अतिशय मनमिळावू असल्याने जाधव यांनी खूप लोके जोडली होती. मंगळवारी गोकुळ जाधव हे आपले काम संपवून इंदापूर तालुक्यातील कळाशीकडे आपल्या पाहुण्याच्या कार्यक्रमासाठी पाच वाजता कुटुंबासह कुगाव किनारी पोचले होते. बोट यायला वेळ लागल्याने साडेपाचच्या दरम्यान गोकुळ जाधव त्यांची पत्नी कोमल व दोन लहान मुले शुभम व माही याना घेऊन कळाशी कडे निघाले होते .

या घटनेत प्रशासनाने या बेकायदा जलवाहतुकीवर निर्बंध आणून जर सुरक्षेच्या सुविधा द्यायला लावल्या असत्या तर एकाच कुटुंबातील चौघांचा दुर्दैवी मृत्यू झाला नसता अशी संतप्त भूमिका गोकुळ जाधव यांचे नातेवाईक व ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत. या घटनेमुळे संपूर्ण जाधव कुटुंब उद्धस्त झाले असून घरातील कमावता माणूस गेल्याने त्यांच्या वृद्ध आईबापांचे कसे होणार असा सवाल ग्रामस्थ करीत आहेत. तातडीने जाधव कुटुंबाला आर्थिक मदत देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. जलवाहतूक सुरु ठेवायची असेल तर शासनाने या बोटीवर सुरक्षेची साधने दिली पाहिजेत अशी मागणी केली .

आता तरी शासनाला जाग येणार का? एकतर बेकायदा जलवाहतूक तातडीने बंद करा अन्यथा नियमानुसार सर्व सुरक्षा साधने देऊन या वाहतुकीला परवानगी द्यावी.

# आम्ही शांतच, त्यांचेच लोक त्यांना पाडणार आणि नाव मराठ्यांचं घेणार; मनोज जरांगेंचा रोख कुणाकडे ?

**छत्रपती संभाजीनगर :** जातीच्या नावाखाली आम्हच्यावर अन्याय करू नका, अन्यथा विधानसभा निवडणुकीत तुम्हाला पाडल्याशिवाय राहणार नाही असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला. त्यांचेच लोक त्यांना पाडणार आणि मराठ्यांचं नाव घेणार असं सांगत मनोज जरांगे यांनी काहीही झालं तरी मराठ्यांनी शांत राहावं असं आवाहन केलं.

**मनोज जरांगे काय म्हणाले ?**

१३ तारखेला मतदानापर्यंत मी आणि माझा समाज चांगला होता, मात्र एकदा १३ तारीख झाली की आम्ही वाईट अशी तुमची नियत. सर्व मराठा समाजाला आव्हान करतो की सगळ्यांनी शांत राहा, फक्त एक महिनाभर शांत राहा. काहीजण म्हणतात निवडणूक झाल्यावर बघू, मतदान झाल्यावर बघू. आता कोण काय करतो ते आम्ही पाहून घेऊ. आपण शांत राहू, त्यांचेच लोक त्यांना पाडणार आहे आणि नाव मराठ्यांचं घेणार आहेत. फक्त शांत राहून कोण काय करतो पाहा. कोणी काय पोस्ट टाकतो, त्याचं नाव लिहून ठेवा. कोण पडला, कोण निवडून आला याचे उत्तरही देऊ नका.

तुमच्यावर जर काही वेळ आली, तुमचा काही घातपात होण्याचा अंदाज दिसला तर मी म्हणतो म्हणून शांत बसू नका. जे लोक जात जातिवाद करून मराठ्यांच्या अंगावर येतील त्या जातीचा नेता पुढच्या काळात कधीच निवडून येऊ द्यायचा नाही. त्यांना सत्तेत घुसू द्यायचं नाही. वेळ आली तर आपला उमेदवार द्यायचा नाही, पण त्याला पाडल्याशिवाय शांत राहण्याचं नाही.

## संपादकीय

# सामान्यांची दुर्बलता!

विस्मरणाची अफाट क्षमता आणि आपले चौकोनी कुटुंब किंवा फार तर आपला समाज या पलीकडे न जाणारी नजर या दोन मूलभूत गुणधर्मामुळे भारतीय समाज इथल्या चाणाक्ष राजकारण्यांसाठी ' युज अँड थ्रो ' स्वरूपाचा झाला आहे. त्यामुळेच निवडणूक आली की त्याच त्या घोषणा, तीच ती आश्वासने नव्याने किंवा नव्या स्वरूपात देत निवडणुका लढविल्या जातात, जिंकल्या जातात. पाच वर्षांपूर्वी कोण काय बोलले होते याचे स्मरण लोकांना राहत नाही किंवा ते आठवण्याचाही प्रयत्न केला जात नाही. मतदान करताना आपण आपल्या मताच्या माध्यमातून देशाचे भवितव्य निश्चित करत असतो याची पुसटशीही कल्पना लोकांना नसते किंवा बहुतांश लोकांना नसते. ज्या लोकांना ही जाणीव असते त्यांची संख्या अतिशय कमी आणि एक उपचार म्हणून मतदान करणार्यांची संख्या अतिशय प्रचंड हे एक दुर्दैवच म्हणावे लागेल. मतदान करताना उमेदवार आपल्या जातीचा आहे का, आपल्या गावचा आहे का, सग्या सोयर्यातला आहे का हे आधी आवर्जून पाहिले जाते. त्या निकषात कुणी फिट बसत असेल तर इतर सगळे विचार बाजूला सारून त्यालाच मत दिले जाते. देशाचे सरकार निवडताना इतका उथळ विचार करणार्या लोकांकडून राजकारणाच्या संदर्भात जागरूकता अपेक्षित असू शकत नाही. खरे तर कशाच्याच बाबतीत हे लोक जागरूक नसतात असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. त्यामुळेच कुठेतरी एखादे महाकाय, अजस्त्र असे होर्डींग कोसळते, दीड दोन डझन लोकांचा दुर्दैवी मृत्यू होतो, पन्नास- शंभर लोक जखमी होतात परंतु उरलेल्यांना त्याचे काहीही सोयरसुतक नसते. आपल्या आजूबाजूची शेतकरी विषन्नपणे शेवटी टोकाचा विचार करीत आत्महत्या करतात पण अगदी शेजारच्यालाही त्याचे काही वाटत नाही. श्रीमंत लोकांच्या बेदरकार मोटार खाली निरपराध गरीब चिरडले जातात परंतु कुठेही चिड निर्माण होत नाही.

सरकारच्या धोरणामुळे हजारो लाखोच्या संख्येने असलेले शेतकरी अक्षरशः भिकेला लागतात परंतु बातम्यांमध्येही त्याचे दखल घेतली जात नाही. सरकारने नोटाबंदी आणली जनतेने ती मुकाट स्वीकारली, सरकारने कोविडचा धाक दाखवून लोकांना जवळपास जबरदस्ती करीत लसी घेण्यास प्रवृत्त केले परंतु कुठेही कोणी तक्रार केली नाही. त्या लसी आता इतर दुष्परिणामांना कारणीभूत ठरल्याचे उघड झाले आहे. त्या औषध निर्मात्या कंपन्यांनीच ही कबुली न्यायालयात दिली आहे, परंतु तरीदेखील आपल्याकडे सगळे काही शांत आहेत. सरकारला हादरवणारी आंदोलने आता होत नाहीत. मोर्चे निघत नाहीत . कुठेही खळबळ अशी दिसत नाही. कधी काही आंदोलने उभी राहतात परंतु ते देखील एका जातीच्या किंवा समाजाच्या परिघातच बंदिस्त असतात. जातीच्या समाजाच्या आंदोलनांना थोडा तरी पाठिंबा मिळतो, परंतु इतर प्रश्नांवरील आंदोलनात मूठभर लोक देखील सामील होत नाही. लोकांची ही उदासीनता, कूपमंडूक वृत्ती आणि विस्मरण क्षमता राजकीय लोकांसाठी जणू काही वरदान ठरत आहे. त्यामुळे निवडणुकीच्या काळात लोकांना भरकटविणे नेत्यांना सहज शक्य होते. अगदी आदल्याच दिवशी ज्या भागात प्रशासनाच्या किंवा सरकारच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे एक मोठी दुर्घटना घडते, ज्या दुर्घटनेत अनेकांचा बळी जातो, अनेक लोक जखमी होतात, त्याच भागातून दुसर्याच दिवशी या देशाचे पंतप्रधान मतांचा जोगवा मागणारी यात्रा काढतात आणि विशेष म्हणजे लोकांचाही त्या यात्रेला मोठा प्रतिसाद मिळतो हे कशाचे लक्षण म्हणायचे?

संबंधित पक्षाने किमान यात्रेचा मार्ग तरी बदलायचा होता किंवा याचा रद्द तरी करायची होती. ही किंवा अशीच कोणतीही दुर्घटना घडली की सरकार नेहमीप्रमाणे आधी नुकसान भरपाई जाहीर करते, नंतर उच्चस्तरीय चौकशीची घोषणा होते आणि त्या पाठोपाठ अशा घटनांसाठी एकमेकांना जबाबदार धरण्याची स्पर्धा राजकीय पक्षांमध्ये सुरू होते. या सगळ्या गदारोळात मूळ समस्या अशीच कायम राहते. असा दुर्घटना असो अपघात असो किंवा शेतकर्यांच्या आत्महत्या असो त्यात मरण पावलेली माणसे त्यांचे असाहाय्य कुटुंबीय त्यांची उध्वस्त स्वप्न या कशाचेच कुणालाही देणे घेणे नसते. मुंबईतील तो वादग्रस्त फलक नियमापेक्षा तिप्पट मोठा होता, विशेष म्हणजे हा फलक उभारण्यासाठी आजूबाजूची काही झाडे विष घालून मारल्याची चर्चा आहे. जाहिराती दिसण्यासाठी या ४०-५० झाडांचा बळी देण्यात आला.

स्वार्थासाठी या यंत्रणांना, त्या यंत्रणांच्या पाठीशी असलेल्या राजकारण्यांना आणि प्रशासनाला झाडे आणि माणसे सारख्याच मोलाची वाटतात. त्यामुळे त्यांचे मरणे या लोकांसाठी फार किरकोळ बाब असते. देशाचे राजकारण, देशाचे अर्थकारण, समाजकारण या सगळ्यांपासून सर्वसामान्य लोक अलिप्त असतात आणि त्याचीच किंमत या लोकांना अशा घटनांमधून लोकांना चुकवावी लागते. सामान्य लोकांचा या सगळ्या यंत्रणांवर अंकुश असता तर सामान्यांची इतकी परवड झालीच नसती.

# दौंडच्या पूर्व भागात पाणी आल्याने शेतकरी समाधानी



**देऊळगाव राजे :** गेल्या दोन महिन्यापासून दौंड पूर्व भागात शेतीला वरदान ठरलेली भीमा नदी कोरडी पडली होती , पूर्व भागातील देऊळगाव राजे ,आलेगाव ,वडगाव, पेडगाव, हिंगणी बेरडी तसेच श्रीगोंदा तालुक्यातील कवठा, अजनुज , पेडगाव ,जलालपूर, सिद्धटेक दुधवडी या गावातील शेतकऱ्यांना पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला या गावातील शेती उजनी धरणाच्या फुगवठा क्षेत्रावर अवलंबून आहे,

यावर्षी उजनी धरण लवकरच मोकळे झाल्याने परिसरात पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली होती, हाता तोंडाशी आलेली पिके पाण्यामुळे सुकून गेली काही शेतकऱ्यांनी मोठा खर्च करून कुपनलिका विहिरी पाडून कसे तरी आपली पिके हिरवी ठेवली होती , वरील भागात थोड्याफार प्रमाणात पाऊस झाल्याने व काही बंधाऱ्याच्या प्लेटी काढल्यामुळे पाणी दोन दिवसापूर्वी देऊळगाव राजे बंधार् यात आले होते तर गुरुवारी दुपारी सिद्धटेक येथे पोहोचले आहे हे पाणी आल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे आता शेतीला आणि जनावरांना पाणी मिळणार असल्याने शेतकरी समाधान व्यक्त करीत आहेत.

> पाटबंधारे खात्याचे अधिकारी यांचे योग्य नियोजन दौंडचे आमदार राहुल कुल, श्रीगोंद्याचे आमदार बबनराव पाचपुते यांच्या सहकार्याने पाणी आल्याने सर्वांचे सर्व शेतकरी वर्गाच्या वतीने मनापासून धन्यवाद.
>
> - गणेश झिटे
> मा. उपसभापती श्रीगोंदा पंचायत समिती .

> पुणे आणि परिसरात काही प्रमाणात पाऊस झाल्याने व मुळा मुठा आणि भीमा नदीवरील बंधाऱ्याच्या प्लेटी काढल्याने पाणी आले आहे.
>
> बनकर एस .एम.
> उप अभियंता दौंड.



# मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मान्सूनपूर्व मशागती सुरू

**तळेगाव दाभाडे :** मावळ तालुक्यातील खरीप भात पिकाचे बी बियाणे खरेदी करण्यासाठी मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जोरदार हालचाली सुरू झाल्या असून, शेतकरी विविध दुकानांमधून बी बियाणे खरेदी करत आहेत. यावर्षी जूनच्या पहिल्या आठवड्यापासून मान्सूनचा पाऊस महाराष्ट्रात सुरू होण्याची शक्यता शासनाच्या हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आलेली आहे. मावळ तालुक्यात हा पाऊस पाच ते दहा जून च्या दरम्यान येईल असा अंदाज गृहीत धरून शेतकरी खरीप पिकाच्या मशागतीसाठी व बी बियाणे जमा करण्याच्या तयारीला लागले आहेत.

मावळ तालुका हा खरीप भात उत्पादनामध्ये अग्रेसर असलेला तालुका आहे. या तालुक्यात सुमारे १३ हजार हेक्टर पर्यंत खरीप भात पिकाची लागवड मोठ्या प्रमाणावर होते. भात लागवडी पूर्वी कमीत कमी २१ ते २५ दिवस अगोदर भाताची रोपे तयार करावी लागतात. त्यासाठी चांगलं बियाणं मिळवण्यासाठी शेतकरी प्रयत्न करत आहेत.यावर्षी शेतकरी चांगल्या पावसाची वाट पाहत असून, सध्या वळवाच्या पावसामुळे खरीप हंगामातील पिकाची पूर्वतयारी म्हणून शेतकरी मशागतीच्या कामाला लागले आहेत.

सध्या शेतकऱ्याकडून आपापल्या शेतात बैलाच्या साह्याने नांगरणी,कोळवणी चालू आहे. तर काही ठिकाणी शेतकरी हे ट्रॅक्टरच्या साह्याने या गोष्टी करत आहेत. अलीकडच्या काळात बरेचशे शेतकरी यांत्रिक भात लागवडीच्या मागे लागले आहेत. त्यामुळे ट्रॅक्टर सारखी वाहन शेतकरी वापरू लागला आहे.खरीपासाठी बी बियाणेखरीप हंगामासाठी शेतकऱ्यास आवश्यक असलेले बी बियाणे भात, नाचणी, सोयाबीन, भुईमूग, चवळी, वाटाणा, तुर, हायब्रीड ज्वारी, मका, मूग, उडीद, पावटा इत्यादींचा समावेश आहे.

# रुंदीकरणाच्या मार्गात बाधित होणारी घरे दुकाने हटवण्याचे काम जोमात सुरू

**जेजुरी :** पुणे- पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग जेजुरी शहरांतर्गत रुंदीकरणाच्या मार्गात बाधित होणारी घरे दुकाने हटवण्याचे काम बुधवारी (दि. २२) केले. यासाठी पोलीस प्रशासन, महसूल, नगर विकास, महावितरण तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे वरिष्ठ अधिकारी वर्गासह मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

गेली वर्षभरापासून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाकडून पुणे ते पंढरपूर पालखी महामार्गाचे रुंदी करण्याचे काम सुरू आहे. जेजुरी शहरांतर्गत उत्तर दिशेला असणाऱ्या नागरिकांची घरी दुकाने अधिग्रहण संपादित करण्यात आली आहेत. २०१५ मध्ये राज्य महामार्गाचे रुंदीकरण करताना उत्तर दिशेकडील व्यवसायिक व रहिवासी यांची घरे दुकाने आठवण रुंदीकरण करण्यात आले होते.

त्याकाळी संपादित केलेल्या जागेचा व तोडण्यात आलेली दुकाने यांची कोणतेही नुकसान भरपाई बाधितांना देण्यात आलेली नव्हती. त्यामुळे उत्तर दिशेला जास्त जागा संपादित करण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष होता. पोलिसांचा बंदोबस्त उत्तर व दक्षिण दिशेला समसमान रुंदीकरण व संपादन व्हावी, अशी मागणी यासाठी गतवर्षी २५ नागरिकांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती.

मार्च २०२४ मध्ये उच्च न्यायालयाने याचिका निकाली काढल्यामुळे जागा संपादनाचा मार्ग मोकळा झाला. या कार्यवाहीसाठी राष्ट्रीय महामार्गाचे वरिष्ठ अभियंता प्रसाद चौगुले, उपविभागीय पोलीस अधिकारी तानाजी बरडे, तहसीलदार विक्रमसिंह राजपूत, पालिका मुख्याधिकारी चारुदत्त इंगोले, पोलीस निरीक्षक दीपक वाघचौरे, यांच्यासह सुमारे १०० पोलीस कर्मचारी तैनात होते.जेजुरीतूनच बाह्यवळण का नाही?राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण करताना सासवड येथे झेंडेवाडी ते बोरावके मळा मार्ग तर, निरेच्या बाहेरून पिसुर्टी ते लोणंद असा बाह्य वळण मार्ग काढण्यात आला आहे. मात्र गेले अनेक वर्ष ग्रामस्थ मागणी करत असतानाही जेजुरीतच बाह्यवळण का नाही? असा सवाल नागरिक करत आहेत.

## उष्णतेची लाट लावतेय वैदर्भीयांची वाट

**नागपूर :** नवतपा सुरू होण्यास आणखी काही दिवस बाकी असताना विदर्भात मात्र आताच उष्णतेची लाट आली आहे. गेल्या तीन दिवसांपासून कमाल तापमानात सातत्याने वाढ होत आहे.

# वाहतूक नियंत्रक दिव्यांच्या दुरुस्तीला निधीचा अडसर

**पुणे :** शहरातील वाहतुकीची समस्या गंभीर झाली असतानाच वाहतूक नियंत्रणात महत्त्वाची भूमिका बजाविणाऱ्या वाहतूक नियंत्रक दिव्यांच्या (सिग्नल) दुरुस्तीसाठी निधीचा अडसर ठरला आहे. चालू आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात सिग्नल दुरुस्तीसाठी यावेळी निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे सिग्नल दुरुस्ती रखडणार असून, शहरातील वाहतूक कोंडीत भर पडण्याची शक्यता आहे.

दरम्यान, अंदाजपत्रकात निधी उपलब्ध नसल्याचे लक्षात आल्यानंतर वर्गीकरणाद्वारे तो उपलब्ध करून देण्यासाठी विद्युत विभागाची धावाधाव सुरू झाली आहे. वाहतुकीचे नियमन करताना सिग्नलची भूमिका महत्त्वाची आहे. मात्र, शहरातील काही भागांतील सिग्नल नादुरुस्त असल्याचे पुढे आले आहे. शहरातील अनेक रस्ते अरुंद आहेत. त्यातच रस्त्यावर विविध प्रकारची अतिक्रमणे झाली आहेत. त्यामुळे शहरातील वाहतूक कोंडीची समस्या गंभीर झाली असून, गर्दीच्या वेळी अनेकदा वाहनचालकांना वाहतूक कोंडीत अडकावे लागत आहे. त्यामुळे पुणे महापालिकेबरोबरच स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत सिग्नल उभारणीला प्राधान्य देण्यात आले असून स्मार्ट सिटीच्या माध्यमातून शहराच्या विविध भागांत १२५ सिग्नल उभारण्याचे नियोजित आहे. स्मार्ट सिटीकडून उभारण्यात येणाऱ्या सिग्नलची देखभाल दुरुस्ती त्यांच्याकडून होणार असून उर्वरीत दुरुस्ती महापालिकेला करावी लागणार आहे.

## मोटारसायकलच्या धडकेत तरूण ठार

**सोलापूर :** कोयना नगर चौकात झेब्रा क्रॉसिंगवरून कोणत्याही प्रकारचे इंडिकेटर व इशारा न देता, मोटारसायकलला धडक देवून तरूणाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी मोटारसायकल चालका विरूद्ध सलगरवस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अभिषेक चंद्रकांत हेगळाडे (वय २२ रा. सुतार अड्डा पाटील नगर, सोलापूर) हा सुदर्शन काळे याच्या सोबत १४ मे रोजी सकाळी १०.४५ वाजण्याच्या सुमारास मोटारसायकल (क्र.एमएच-१३ डीआर-२०९८) वरून जात होता.

# जिथे पाणी नाही तिथे मत्स्य विद्यापीठ आंधळ दळतंय अन् कुत्रं पीठ खातय

**मुंबई :** सव्वातीन लाख हेक्टर जलक्षेत्र असणारा कोकण ७२० किलोमिटर लांबीच्या समुद्रकिनाऱ्याने समृध्द आहे. असे असताना जिथे पाणी नाही तिथे मत्स्य विद्यापीठ म्हणजे, आंधळ दळतंय अन् कुत्रं पीठ खातय असा प्रकार आहे. त्यामुळे सरकारने आता शाळा कॉलेज प्रवेश सुरू झाल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय नियोजन आयोगाने २०११ साली दिलेला जागतिक मत्स्य विद्यापीठ अहवाल धूळ झटकून पाहावा व मत्स्य विद्यापीठाचे मुख्य केंद्र कोकण करून जागतिक पातळीवर कोकणचे अजून मोठे करावे. अशी मागणी केंद्रीय नियोजन आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी केली आहे.

केंद्रीय नियोजन आयोगाच्या माध्यमातून डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या अध्यक्षतेखाली कोकणात जागतिक कीर्तीचे मत्स्य विद्यापीठ होण्यासाठी एक अहवाल सन २०११ साली महाराष्ट्र सरकारला दिला गेला होता.

या अहवालाकडे कोकणातील काय कोणत्याही लोकप्रतिनिधींनी लक्ष दिले नाही. त्यामुळे हा अहवाल धूळखात पडला आहे.

स्वर्ग असणाऱ्या कोकणात दाभोळचा एनरॉन , नानारची रिफायनरी, लोट्याची एम आय डी सी असे अनेक रासायनिक प्रकल्प कोकणात आणून कोकण केमिकल झोन करण्याचे व स्वर्गासारख्या कोकणाचा नरक करण्यासाठी सरकारचे शढयंत्र सुरू असून जिथे पाणी नाही तिथे मत्स्य विद्यापीठ असा अजब गजब कारभार सरकार का करत आहे ? असा सवाल डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी केला.

कोकण, मासे व निसर्ग हे समीकरण आहे. कोकणातील हापूस , मच्छी , लोणचे जगभर प्रसिद्ध आहे. जगाला कोकणाचे कौतुक आहे. मात्र सरकारला नाही. कोकणात मत्स्य विद्यापीठ करण्यासाठी एक हजार कोटी खर्च आहे. मात्र लाखो करोडो रुपये खर्च करून कोकणाचा विषारी केमिकल झोन करण्याचे षडयंत्र सुरू आहे. लोकप्रतिनिधी तर आरोप प्रत्यारोप व ईडी भीतीपोटी या पक्षातून त्या पक्षात पळत सुटले आहेत. विकास व धोरण या दोन्ही शब्दांचा त्यांना विसर पडला आहे.

कोकणातील समुद्रात फक्त मासे नाहीत. तर हजारो प्रकारची जैवविविधता आहे. परदेशात अशी जैवविविधता खूप कमी प्रमाणात आहे. जगभरात नसलेली जैवविविधता भारतात व कोकणात आहे. मात्र सरकारला त्याचे कौतुक नाही. विषारी केमिकल प्रकल्प आणून स्वर्ग असणारा कोकण नर्क तयार करण्याचे पाप सरकार करत आहे.

आता शाळा कॉलेज प्रवेश सुरू झाले आहेत. त्यामुळे सरकारने २०११ चा अहवाल धूळ झटकून पाहावा व अहवालाप्रमाने रत्नागिरीत मत्स्य विद्यापीठाचे मुख्य केंद्र करावे. सव्वातीन लाख हेक्टर जलक्षेत्र असणारे कोकण जगभरातील जैवविविधतेचे प्रमुख केंद्र निर्माण करावे. अशी मागणी केंद्रीय नियोजन आयोगाचे मा.सदस्य व या अहवालाचे प्रमुख डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी केली आहे .

# कोंढवा येथे बुद्ध जयंती उत्सव साजरा



**पुणे :** इनक्रेडीबल समाजसेवक ग्रुप तसेच हडपसर विभाग संविधान गट तर्फे गुरुवार , दि.२३ मे रोजी बुद्ध जयंती उत्सव साजरा करण्यात आला.बुद्ध पौर्णिमा हि तथागत गौतम बुद्ध यांची जयंती असल्याने सर्वधर्मसमभाव जपण्याच्या उद्देशाने हा उपक्रम एकत्रित पणे साजरा करण्यात आला.असलम इसाक बागवान यांनी स्वागत केले.भैरवनाथ मंदिर समोर (लोणकर स्मशानभूमी द्वार) कोंढवा येथे 'एक गाव, एक उत्सव' या धारणेने दुपारी १ वाजता हा कार्यक्रम झाला.

बाल गटा कडून बौध्द वंदनेने या कार्यक्रमास सूरूवात करण्यात आली .उपस्थीतापैकी असलम इसाक बागवान, आशा भोसले, कांचन बलनाईके, वीणा कदम ,अहमद शेख यांनी भगवान गौतम बुद्ध यांच्या धम्माची माहिती उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशा भोसले यांनी केले ,ढावरे यांनी आभार मानले.भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेस सर्व उपस्थितांनी पुष्प अर्पण केले.

या कार्यक्रमास कोंढवा गावातील डॉ सूर्यवंशी ,अशोक गायकवाड,अब्बास शेख,विनित,राकेश निद्रानिया, सचिन खिलारे,गौसीया शेख,सोहेल खान,महिला वर्ग तसेच सफाई कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमास शंभरहून अधिक नागरीक सहभागी होते.येथून पुढे कुठल्याही सामुदायिक कार्यक्रमात,साऊंड -डिजे लावणार नाही,नाचगाणी करणार नाही ,ध्वनी प्रदुषण करणार नाही, वाहतूकीला अडथळा करणार नाही,सर्व भारतीयांना आपले बंधू आणि भगिनी समजून देशात एकता, बंधूता, समानता आणू, अशी शपथ घेवून कार्यक्रमाची सांगता केली.

# धोकादायक इमारतींसह पुलांचे संरचनात्मक लेखापरीक्षण

**नाशिक :** शहरात ११९८ धोकादायक वाडे व घरे असून पावसाळ्यात काझीगढी परिसरात दरड कोसळण्याची शक्यता असते. असे वाडे, घरे आणि काझी गढी परिसरातील रहिवाशांना सुरक्षित स्थळी स्थलांतरीत करण्यासाठी नोटीस बजावली गेली आहे. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी धोकादायक क्षेत्रातील वाडे, घरे पोलिसांच्या मदतीने रिकामे करण्याची तयारी करण्यात आली आहे.

नाशिकसह मालेगाव महानगरपालिका आणि नगरपंचायत क्षेत्रातील धोकादायक वाडे, इमारती व पुलांचे संरचनात्मक लेखापरीक्षण करण्याचे निर्देश जिल्हा आपत्ती प्राधिकरणने स्थानिक यंत्रणेला दिले आहेत.

मान्सून काळातील भूस्खलन, पूर अशा संभाव्य आपत्तीच्या दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासकीय पातळीवर तयारी सुरू झाली आहे. पावसाळ्यात अनेकदा जुन्या वाड्यांची पडझड होते. यात जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही,

नाशिक शहरात ११९८ धोकादायक वाडे, इमारती, घरे आहेत. यात नाशिक पश्चिम विभागात ५२७, सातपूर ६१, काझीगढी भागात १५२, नाशिक पूर्व विभागात १२२, नवीन नाशिक ७१, पंचवटी २०३ आणि नाशिकरोड विभागातील ६२ वाडे, घरांचा समावेश आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# नाशिक जिल्ह्याला टंचाईच्या झळा; ३४८ गावे आणि ८७२ वाड्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु



**नाशिक** : उत्तर महाराष्ट्रासह राज्यातील २४ जिल्ह्यात तापमानाचा पारा चाळीशी पार गेल्याने उष्णतेच्या लाटेची स्थिती निर्माण झाली आहे. ही स्थिती शनिवार (दि.२५ मे) पर्यंत राहणार आहे. तर दुसरीकडे अनेक ठिकाणी पाणीटंचाई जाणवत असून टँकरने पाणी पुरवठा सुरु आहे. तसेच चाराटंचाईमुळे पशुधनही धोक्यात आले आहे. त्यामुळे पाणीटंचाई आणि चाराटंचाईचा हा पश्न सोडवण्यासाठी सरकार त्या-त्या पातळीवर उपाययोजना कधी करणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पाणीटंचाईच्या संदर्भात नाशिक जिल्ह्याचा विचार केला असता सध्या जिल्ह्यात उष्णतेची लाट आलेली असताना झपाट्याने पाण्याचा साठा कमी होत चालला आहे. सद्यस्थितीत नाशिक जिल्ह्यातील ३४८ गावे आणि ८७२ वाड्या अशा एकूण एक हजार २२० गाव-वाड्यांना ३७० टँकरच्या ८१४ फेऱ्यांद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. यात १४ शासकीय आणि ३५६ खासगी टँकरचा समावेश आहे. तर टँकर भरण्यासाठी आतापर्यंत तब्बल २०१ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले. यात गावांसाठी ६१, तर टँकरसाठी १३४ विहिरींचा समावेश आहे. त्यामुळे एकीकडे उन्हाची तीव्रता वाढत असल्याने गावोगावी पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यामुळे प्रशासन, शासन यांनी आता या गोष्टींकडे लक्ष द्यावे, अशी मागणी होऊ लागली आहे. तसेच जोपर्यंत पाऊस पडत नाही तोपर्यंत पाणीटंचाईबाबत आणखी भयावह परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

धरणांमध्ये २४.२४ टक्के जलसाठा

उन्हाच्या झळा आणि स्थानिक जलस्त्रोत आटू लागल्याने ग्रामीण भागात टँकरची मागणी वाढू लागली आहे. राज्यभरातील

धरणांमध्ये जेमतेम २४.२४ टक्के जलसाठा शिल्लक आहे. राज्यात २३ जिल्ह्यातील १० हजार गावे आणि पाड्यांना ३,५०० टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

**चारा छावण्यांची गरज**

राज्यात अनेक ठिकाणी चारा नसल्याने दूध उत्पादक शेतकऱ्यासमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. राज्याला मोठ्या दुष्काळाचा सामना करावा लागत असून राज्य सरकारने उपाययोजना करण्यासाठी पावले उचलणे गरजेचे आहे. राज्यात तातडीने चारा छावण्या सुरु केल्या पाहिजेत अवकाळी पावसाच्या तडाख्याने आधीच शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे, त्यात आता दुष्काळाचे संकट ओढवले आहे. तसेच नाशिक जिल्ह्यातील चाराटंचाईचा विचार केल्यास जिल्ह्यात लहान मोठी जनावरे, शेळ्या-मेंढ्या धरून एकूण १९ लाखाहून अधिक जनावरे आहेत. या सर्व जनावरांना प्रतिमहिना एक लाखाहून अधिक टन चारा लागतो. मात्र सध्या जिल्ह्यात फक्त तीन लाख ७० हजार टन चारा उपलब्ध आहे. हा चाऱ्याचा साठा जूनअखेर पुरेल इतकाच आहे. तसेच दोन लाख जनावरांची तहान २८६ टँकरद्वारे भागविली जात आहे. त्यामुळे सरकारने तातडीने पाणी आणि चाराटंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी उपाययोजना कराव्यात अशी मागणी होत आहे.

**राज्यात ४५ दिवस पुरेल एवढाचा चारासाठा?**

राज्यात ४५ दिवस पुरेल एवढा चारा उपलब्ध असल्याचे पशुसंवर्धन आणि दुग्धविकासमंत्री राधाकृष्ण विखे पाटील सांगत असल्याचे काँग्रसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे. तसेच जर चारा उपलब्ध असेल तर मग चारा छावण्या सुरु करण्यासाठी महाभ्रष्ट्युती सरकार कोणत्या मुहूर्ताची वाट पाहत आहे? राज्यात तातडीने चारा छावण्या सुरु केल्या पाहिजेत. अवकाळी पावसाच्या तडाख्याने आधीच शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे, त्यात आता दुष्काळाचे संकट ओढवले आहे. शेतकरी चारी बाजूनी संकटाने घेरला असून त्याला आधार देण्यासाठी सरकारने तातडीने उपयायोजना कराव्यात, अशी मागणीही नाना पटोले यांनी केली आहे.

**नाशकात शनिवारी पाणीबाणी**

नाशिक शहरात विविध ठिकाणी पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य वितरण वाहिन्या तसेच उपवितरण वाहिन्यांची तसेच व्हॉलची दुरुस्ती, व्हॉल बदलणे आदी देखभाल दुरुस्तीच्या कामांसाठी मनपा क्षेत्रात शनिवार (दि. २५) रोजी दिवसभर तर रविवार (दि. २६) रोजी सकाळचा पाणीपुरवठा कमी दाबाने होणार आहे. तरी नागरिकांनी पाणी काटकसरीने वापरावे व महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन अधीक्षक अभियंता, पाणीपुरवठा विभाग संजय अग्रवाल यांनी केले आहे.

# नंदुरबारमध्ये काँग्रेसला शिंदे गटाची साथ, भाजपविरोधात ओपन प्रचार

**नंदुरबार** : राज्यात लोकसभेसाठी भाजपा, शिवसेनेमधील शिंदे गट आणि राष्ट्रवादी या महायुतीतील घटक पक्षांनी एकत्र राज्यभर निवडणुका लढवल्या. मात्र नंदुरबार लोकसभेमध्ये भाजप विरुद्ध काँग्रेस अशी लढत असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नंदुरबार येथे येऊन मध्यस्थी करूनही शिंदे गटातील पदाधिकाऱ्यांनी काँग्रेसचा प्रचार करीत मतदानावेळी मदत केल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे चार जून रोजी निकालानंतर नंदुरबार जिल्ह्यात भाजपा व शिंदे गटात मोठा संघर्ष पाहायला मिळणार आहे असे चित्र दिसत आहे.

नंदुरबार जिल्ह्यात आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित व शिंदे गटाचे नेते चंद्रकांत रघुवंशी यांचा संघर्ष गेल्या पंचवीस वर्षापासून आहे. डॉ. विजयकुमार गावित हे सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मंत्री होते. तर चंद्रकांत रघुवंशी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा आमदार म्हणून कार्यरत होते. त्यावेळी राज्यात युती असतानाही दोघांमधील प्रचंड वाद होते. तेव्हापासून या नेत्यांमध्ये कुठल्या ना कुठल्या गोष्टीवरून संघर्ष सुरूच असतो. २००९ मध्ये नंदुरबार विधानसभेसाठी राष्ट्रवादीने डॉ. विजयकुमार गावित यांना उमेदवारी दिली होती. त्याचवेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत रघुवंशी यांनी भाजपाच्या उमेदवार सुहासिनी नटावदकर यांना उघड पाठिंबा देत 'दे धक्का' म्हणत प्रचार करीत भाजपला मदत केली. मात्र या निवडणुकीत डॉ. विजयकुमार गावित हे विजयी झाले.

# देवनदी बंधाऱ्यात बुडून दहावीतील दोन मुलांचा मृत्यू

**नाशिक** : सिन्नर शहरापासून जवळच असलेल्या कुंदेवाडीजवळील देवनदी बंधाऱ्यात पोहण्यासाठी गेलेल्या इयत्ता दहावीतील दोन मुलांचा बुडून मृत्यू झाला. सिन्नरमधील आंबेडकर नगरचे दोघे रहिवासी आहेत. गुरूवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास ही घटना घडली.

सार्थक जाधव आणि अमित जाधव हे दोघे मित्रांसह कुंदेवाडी येथील देवनदीवरील बंधाऱ्यात पोहण्यासाठी गेले होते. पाण्याचा अंदाज न आल्याने दोघेही बुडाले. सोबतच्या मित्रांनी आरडाओरड केल्यावर मदतीसाठी परिसरातील नागरिक धावले.

पोलिसांना घटनेची माहिती मिळाल्यानंतर निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्यासह कर्मचाऱ्यांनी मदतकार्य सुरु केले. दोघांचे मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आले.

अमित आणि सार्थक या दोघांनी इयत्ता १० वीची परीक्षा दिली होती. प्रवीण जाधव, लखन खरताळे, राम जाधव, अमोल जाधव, रोहन भावसार, शरद जाधव, नवनाथ बर्डे आदी तरुणांनी मदतकार्य केले.

# महाराष्ट्रात येऊ घातलेला अजून एक प्रकल्प परराज्यात

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंचा सरकारला विचारला जाब*

**मुंबई** - महाराष्ट्रात गुंतवणूक करणारे अनेक प्रकल्प यापूर्वीच परराज्यात गेले असताना आता अजून एक प्रकल्प परराज्यात गेल्याचे इकॉनॉमीक्स टाइम्स या वृत्तपत्राने दिलेल्या बातमीने समोर आल्याचे ट्विट विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी करत याबाबत सरकारला दानवे यांनी जाब विचारला आहे. तसेच राज्यात येणारी गुंतवणूक कमी होत असल्यामुळे राज्य अधोगतीला जाते की काय अशी शंका व्यक्त करत राज्याची प्रगती, तरुणांचा रोजगार दुसऱ्याच्या घशात घालण्याबाबत दानवे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.



याबाबत अशी माहिती की, राज्यातील छत्रपती संभाजीनगर किंवा दाभोळ येथे गेल इंडिया ही पेट्रोकेमिकल्स कंपनी ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार होती. या गुंतवणुकीच्या माध्यमातून इथेन क्रॅकिंग युनिट उभारणार होते. आता हा प्रकल्प महाराष्ट्रात न येता मध्यप्रदेशच्या सिहोर येथे उभारला जाणार आहे. हा प्रकल्प महाराष्ट्राचा विचार करत असताना मध्य प्रदेशात कसा गेला? महाराष्ट्राचा वाट्याला येणारा रोजगार असा सहज बाहेर कसा गेला? याचे उत्तर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि उद्योगमंत्री यांनी द्यावे, अशी मागणी दानवे यांनी केली आहे.

सदर कंपनीने प्रकल्प उभारणीच्या जागेसाठी विचारणा केली होती का? विचार केला होता तर त्यांनी महाराष्ट्रात प्रकल्प का नाकारला? सरकारी कंपनी असल्याने मध्य प्रदेशात हा प्रकल्प नेण्यासाठी केंद्राने दबाव टाकला का?

याची उत्तरे सरकारने द्यावी, असे दानवे यांनी म्हटले.

महाराष्ट्रात येणारी गुंतवणूक केंद्राच्या दबावामुळे सतत परराज्यात जातेय. एकप्रकारे प्रधानमंत्री हे महाराष्ट्रावर बेगडी प्रेम दाखवत आहेत. राज्यातील तरुणांच्या हाताला मिळणार रोजगार हिसकावून दुसऱ्याच्या घशात घालण्याचा पाप भाजप करत असल्याचा आरोप दानवे यांनी केला आहे.

# माजी आमदार शरद सोनवणे २४ तारखेपासून आळेफाटा चौकात करण्यात बेमुदत उपोषण

**नारायणगाव** - नारायणगाव : जुन्नर तालुक्यात बिबट्याचे हल्ले मोठ्या प्रमाणात होत असताना वन विभागाचे उपवनसंरक्षक अधिकारी अमोल सातपुते निष्क्रिय वागत असून बिबट्याला पकडण्यासाठी योग्य उपाय योजना न करता शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात मग्न असून अशा निष्क्रिय अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करण्यात यावे या मागणीसाठी जुन्नरचे माजी आमदार शरद सोनवणे शुक्रवार (ता.२४ ) पासून आळेफाटा एसटी स्टँड चौकात सकाळी दहा वाजल्यापासून बेमुदत उपोषण करणार आहेत. सोनवणे यांनी त्यांच्या रायगड या निवासस्थानी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते.विविध आठ मागण्यासाठी ते उपोषण करणार आहेत. या मागण्या खालील प्रमाणे १)जुन्नर तालुक्यात बिबट्यांचे हल्ले मोठ्या प्रमाणात होत असताना उपवन संरक्षक अमोल सातपुते निष्काळी वागत असल्याने त्यांना शासनाने तात्काळ निलंबित करण्यात यावे. २)माणिकडोह या ठिकाणी नव्याने बिबट निवारा केंद्रासाठी संपादित केलेल्या जागेवर ३०० बिबटे ठेवण्याबाबतचे नियोजन करण्यात यावे.३)जुन्नर आंबेगाव खेड शिरूर हे चार तालुके आपत्ती क्षेत्र म्हणून जाहीर करून दिवसा थ्री फेज लाईट देण्यात यावी ४) बिबट व मानव संघर्ष कमी करण्यासाठी पकडलेल्या सर्व बिबट्याना अभयारण्य सोडून द्यावे. ५)उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा ६) जुन्नर तालुक्यात बिबट्यांच्या हल्ल्यामध्ये मानव मृत्यूच्या संख्येत कामालीची वाढ झाली असून जुन्नर तालुक्यासाठी वन विभागाचे मनुष्यबळ वाढवण्यात यावे. व तीनशे पिंजरे बिबट्यांना पकडण्यासाठी देण्यात यावे. ७) धनगर समाज हा भटकणाऱ्या समाज आहे त्यांचे प्रत्येक धनगर वाड्यावर आवाजाची बंदूक देण्यात यावी.८) वन खात्याने ज्या शेतकऱ्यांनवर गुन्हे दाखल केले आहे ते तात्काळ मागे घेण्यात यावे या आठ मागण्या माजी आमदार सोनवणे यांनी पत्रकार परिषदेमध्ये केल्या.



वारंवार होणाऱ्या बिबट्याच्या हल्ल्यात होणारी मनुष्य हानी व त्यानंतर स्थानिक लोकांवर वनविभागाच्या वतीने दाखल केलेले गुन्हे, या निषेधार्थ जुन्नर वनविभागाचे उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांच्या निलंबणासाठी माजी आमदार शरद सोनवणे शुक्रवार दिनांक २४ मे २०२४ पासून आळेफाटा येथे सकाळी १० वाजता बेमुदत उपोषणाला बसणार आहेत. यामुळे वन विभागाचे धाबे दणाणले असून यावर उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांची प्रतिक्रिया घेण्यासाठी संपर्क साधला असता मी जेवण करत आहे मी नंतर बोलतो अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

# धारण तलाव स्वच्छतेचा अडसर कायम

**नवी मुंबई** : धारण तलाव स्वच्छतेचा अडसर कायम, प्रशासन एमसीझेडएमए परवानगीच्या प्रतीक्षेत (छायाचित्र - लोकसत्ता टीम)

नवी मुंबई : नवी मुंबई शहरातील धारण तलावांची स्वच्छता गेल्या कित्येक वर्षांपासून करण्यात आलेली नाही. धारण तलावात आलेल्या कांदळवनामुळे गाळ काढण्यात अडचणी येत आहेत. पावसाळ्यात सांडपाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी याची निर्मिती करण्यात आली होती. मात्र आता त्यात गाळ साचलेल्याने पावसाळ्यात पाणी साचते.

कांदळवनातील गाळ काढण्यासाठी महापालिकेला एमसीझेडएमएची परवानगी अद्याप मिळाली नाही. त्यामुळे धारण तलावांमधून पाण्याचा योग्य निचरा व्हावा म्हणून पालिकेतर्फे सीबीडी येथील पंप हाऊससमोरील गाळ काढण्यास सुरुवात केली आहे.

नवी मुंबईत शहर हे खाडीकिनारी वसले आहे. त्यामुळे खाडीत येणाऱ्या भरतीचे पाणी शहरात येऊ नये व शहरातील सांडपाण्याचा निचरा खाडीत व्हावा या हेतूने सिडकोने नवी मुंबईतील विविध भागांत धारण तलाव तयार केले आहेत. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात ११ धारण तलाव आणि स्टॉर्म वॉटर पंप हाऊसला लागून असलेले दोन धारण तलाव असे एकूण १३ धारण तलाव आहेत.



# सोलापुरात पुन्हा दिसला दुर्मिळ माळढोक पक्षी

## नान्नज अभयारण्यातील गणनेत आढळले १४ प्रकारचे प्राणी-पक्षी

**सोलापूर** : सोलापूरची ओळख असलेला माळढोक पक्षी नान्नज अभयारण्यात पुन्हा आढळून आला आहे. अत्यंत दुर्मिळ असलेल्या माळढोक यंदाच्या वर्षी दिसून आल्याने पर्यावरणप्रेमीकडून आनंद व्यक्त केला जातोय. दरवर्षी बुद्धपौर्णिमेला नान्नज अभयारण्यात वन्य प्राण्यांची गणना केली जाते. यंदाच्या वर्षीच्या गणनेत माळढोक सोबतच कुदळ्या पक्षी दिसला असून नीलगायींची संख्येतही वाढ झाली आहे.

मागील वर्षीच्या गणनेत ४ नीलगायी आढळून आल्या होत्या

मादी माळढोक पक्षीसह २१ कुदळ्या पक्षी दिसून आले. मागील वर्षीच्या गणनेत ४ नीलगायी आढळून आल्या होत्या, त्यात आता वाढ झाली असून त्यांची संख्या ६ झाली आहे. यासह खोकड, रानमांजर, रानडुक्कर, कोल्हा, मोर, निलगाय आणि काळवीट यांच्या संख्येत वाढ झाल्याचे आढळले. या गणनेत एकूण १४ प्रकारचे प्राणी आणि पक्षी आढळले. त्यांची एकूण संख्या ही ७५७ इतकी दिसून आली.

**गणनेत आढळलेले पक्षी आणि प्राणी**

माळढोक - १, कुदळ्या - २१
लांडगा - ८, खोकड - १३
मुंगुस - ५, रानमांजर - ६
ससा - १८, रानडुक्कर - २४९
सायाळ - १, कोल्हा - ४
घोरपड - २
मोर - ६१
नीलगाय - ६
काळवीट - ३६२

# काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून मागणी

## पुणे पोलिसांचा कार अपघात प्रकरणात हलगर्जीपणा, राजकीय हस्तक्षेप होता का?

**मुंबई,** पुण्यातील कल्याणीनगर भागात झालेल्या भिषण कार अपघातात दोघांचा मृत्यू झाला असताना कार चालकाची अवघ्या १५ तासात सुटका होते हे अत्यंत गंभीर असून गरिब व श्रीमतांना वेगळे कायदे असल्याचे यातून स्पष्ट दिसत आहे. कार चालक हा बांधकाम व्यावसायिकाचा मुलगा असल्याने त्याची सहज सुटका करण्याचा प्रकार झाला हे अत्यंत आक्षेपार्ह व सामान्यांना न्याय नाकारणारे आहे, पुण्यातील संपूर्ण घटनाक्रम पाहता पुणे पोलिसांनी हे प्रकरण गांभिर्याने हाताळले नसल्याचे स्पष्ट दिसत आहे. पुणे अपघात प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करावी, व दोषींना कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून केली आहे.



राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाठवलेल्या पत्रात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणतात की, पुणे शहरातील कल्याणीनगर भागात शनिवार दि. १९ मे २०२४ रोजी मध्यरात्री एका भरधाव वेगाने जाणाऱ्या कारने दुचाकीला धडक दिल्याने दोघांचा मृत्यू झाला, ही घटना अत्यंत गंभीर आहे. ही कार एक अल्पवयीन मुलगा बेदकारपणे चालवत होतो व मद्यपान करुन आलेला होता हे आतापर्यंतच्या माहितीवरून स्पष्ट झालेले आहे. घटना गंभीर असतानाही या प्रकरणात पुणे पोलीसांनी हलगर्जीपणा केल्याचे उघड झाले आहे. कारचालक मुलगा वेदांत अग्रवाल याची वैद्यकीय तपासणी केली नाही, दोघांचा मृत्यू झाल्याची घटना असतानाही किरकोळ कलमे लावून तातडीने त्याला बाल न्याय मंडळासमोर हजर केले व त्याची जामीनावर सुटका करण्यात आली. दोघांचा जीव घेण्यास कारणीभूत ठरलेल्या त्या आरोपीला जामीन देताना अत्यंत किरकोळ अटी घातल्या होत्या त्यात अपघात या विषयावर निबंध लिहण्यास सांगितले होते, हा हास्यास्पद व चीड आणणारे आहे. राज्यभरातील जनतेने तीव्र संताप व्यक्त केल्यानंतर त्या मुलाला बालसुधारगृहात व त्याचे वडील बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल यांना पोलीस कोठडीत पाठवण्यात आले आहे.

घटना गंभीर असतानाही १५ तासात आरोपीची सुटका होऊ शकते हे अनाकलनीय आहे. यामुळे काही प्रश्न उपस्थित झाले आहेत. पुणे पोलिसांवर कोणाचा दबाव होता का? ज्यामुळे आरोपी मुलाला वाचवण्याचा प्रयत्न केला.

आरोपीची वैद्यकीय चाचणी का केली नाही? व तातडीने न्यायालयात हजर करून जामीन मिळावा याची तजवीज केली होती का? अपघातानंतर सत्ताधारी पक्षाचा एक आमदार पोलीस स्टेशनमध्ये होता अशी माहिती समोर आली आहे. त्या आमदाराची या प्रकरणात नेमकी भूमिका काय? कारचालक मुलाच्या वडीलांचे कुख्यात माफियाशी संबंध असल्याचेही समजते. तसेच राज्याचे गृहमंत्री अचानक पुणे पोलिस आयुक्तांच्या कार्यालयाला भेट देतात व पत्रकारांना खुलासे करतात, एवढी तत्परता त्यांनी दाखवण्याचे कारण काय? ज्या बेकायदेशीर घटनांमध्ये भाजपाचा काही संबंध असतो वा इतर संबंध असतात त्या ठिकाणीच फडणवीस तातडीने जातात, हे संशयास्पद आहे. कोरोना काळात रेमडेसिवीर इंजक्शनचा काळाबाजार करणाऱ्याला अटक केली असता ह्याच गृहस्थाने मध्यरात्री पोलीस स्टेशनमध्ये जाऊन पोलीस कारवाईत हस्तक्षेप केला.

परवा भाजपा उमेदवाराने पैसे वाटल्याचे प्रकरण झाले असता तेथेही हे गृहस्थ गेले होते, एरवी ते कोणतेच प्रकरण गांभिर्याने घेत नाहीत. मग याच प्रकरणात एवढी तत्परता का? या प्रकरणात पुण्याचे पालकमंत्री मात्र कुठेच दिसत नाहीत हेही आश्चर्याचे आहे, असेही नाना पटोले म्हणाले.

# कालव्यात कार पडून झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू तर तिघे जण जखमी

**उरुळी कांचन :** उरुळी कांचन - जेजुरी राज्य मार्गावरील शिंदवणे ग्रामपंचायत हद्दीत नव्या कालव्याचा लोखंडी कठडा तोडून एक चारचाकी पाण्यात पडली असून, या घटनेत एकाचा जागेवरच मृत्यू झाला आहे तर तिघेजण जखमी झाले आहेत.

अमर साहेबराव घाडगे (वय- २८, रा. जुन्नर,) असे अपघातात मृत्यू पावलेल्या चारचाकी चालकाचे नाव आहे. तर या अपघातात गणेश संजय थोरात (वय- २२), शुभम शंकर इंगोले (वय- २१, रा. दोघेही, केसनंद, वाघोली, ता. हवेली), व आदित्य महादेव तावरे (वय- २०, रा. जुन्नर,) असे जखमी झालेल्या तिघांची नावे आहेत.

**सकाळी साडेसहाला झालेल्या घटनेची माहिती पोलिसांना स्थानिक ग्रामस्थांनी देण्याचा प्रयत्न केला, परंतु कोणीही उपलब्ध न झाल्याने पोलिसांपर्यंत ही माहिती पोहोचू शकली नाही, पोलीस घटनास्थळी येण्यास सुमारे दोन तासाचा कालावधी गेला. त्यामुळे अपघातग्रस्तांना तातडीची मदत करण्यास ग्रामस्थांना अडचणीला सामोरे जावे लागले. दोन तासांनी दोन पोलीस कर्मचाऱ्यांनी हजेरी लावली असल्याचे अपघातस्थळी मदत कार्य करणाऱ्या काही नागरिकांनी सांगितले.**

आज गुरुवारी (ता. २३) सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार हे चौघेजण बकऱ्या विकण्याचा व्यवसाय करतात. आज सकाळी फलटण येथील बाजार असल्याने चौघेजण चारचाकी (एम एच १६ किंवा ४६ जीयु ७९८१) गाडीतून निघाले होते. शिंदवणे येथील कालव्यावर आले असता अमर चे गाडीवरील नियंत्रण सुटले व गाडी कठडा तोडून थेट कालव्यात जाऊन पडली.

दरम्यान, ही माहिती मिळताच शेजारी राहणाऱ्या नागरिकांनी व सचिन उर्फ बाळा महाडिक यांनी तात्काळ मदत केली. यावेळी चौघांना गाडीतून बाहेर काढले.त्यात तिघेजण किरकोळ जखमी झाले, तर चालक अमर घाडगे याचा जागेवरच मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे. दरम्यान या अपघातानंतर शिंदवणे गावचे माजी सरपंच गणेश महाडिक यांनी, या पुलाचे रुंदीकरणाचे व नुतनीकरणाचे काम तातडीने सुरू केले नाही तर उद्यापासून ग्रामस्थांसह आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

ते म्हणाले की, ऑक्टोबर २०२३ मध्ये मी रस्त्याच्या कामांसाठी व या पुलाच्या कामासाठी उपोषण केले होते. त्यावेळी मला बांधकाम व पाटबंधारे खात्याने या पुलाच्या रुंदीकरणाचे व नूतनीकरणाचे कामासाठी दोन कोटी रुपये मंजूर झाले असून, लवकरच काम सुरू करण्यात येईल असे आश्वासन दिले होते, मात्र अद्याप हे काम सुरू न झाल्याने या ठिकाणी अपघातांची संख्या वाढलेली आहे.

# वैष्णोदेवीच्या दर्शनाला निघालेल्या कुटुंबावर काळाचा घाला

## सहा महिन्यांच्या बालिकेसह सात मृत्यू, १९ जखमी

**उत्तर प्रदेश:** उत्तर प्रदेशच्या बुलंदशहरहून वैष्णोदेवीच्या दर्शनाला जात असलेल्या टेम्पो ट्रॅव्हलरने ट्रेलरला पाठीमागून जोरदार धडक दिली. यामध्ये एकाच कुटुंबातील सात जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर १९ जण जखमी झाले आहेत. अंबाला-दिल्ली हायवेवर मोहडाजवळ हा भीषण अपघातरात्री २ च्या सुमारास झाला आहे.टेम्पो ट्रॅव्हलरची



अवस्था पाहून अपघाताच्या तीव्रतेचा अंदाज येऊ शकतो. ही टेम्पो ट्रॅव्हलर निम्मी चेपली गेली आहे. मृतांमध्ये सहा महिन्यांच्या बालिकेचाही समावेश आहे. जखमी हायवेवर इकडे-तिकडे फेकले गेले होते. तर काही जखमी बसमध्येच अडकले होते. हायवेवरून जाणाऱ्यांनी तातडीने जखमींना मदत केली. पोलिसांनी अपघातस्थळी पोहोचत जखमींना दोन वेगवेगळ्या हॉस्पिटलमध्ये दाखल केले. काही जखमींची प्रकृती गंभीर असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

# जि.प.च्या नवीन इमारतीत काही विभाग होणार 'शिफ्ट'

**नाशिक :** जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे तीन मजल्यांचे बांधकाम झाले असून उर्वरित तीन मजल्यांच्या कामाला मागील मार्चमध्ये सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. बांधकाम झालेल्या तीन मजल्यांचे बांधकाम पूर्ण झाले असले, तरी अद्याप त्याची रंगरंगोटी अपूर्ण असून फर्निचर करण्यासाठी निधीची तरतूद नसतानाही काही विभाग हलविण्याच्या हालचाली सुरु आहेत. तसेच फर्निचर नसल्यामुळे नवीन ठिकाणी या कार्यालयांचे स्थलांतर कसे शक्य होणार हा प्रश्न अनुत्तरीत आहे.




या परिस्थितीत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नुकतेच नवीन इमारतीची पाहणी करून लवकरात लवकरच जिल्हा परिषदेचे कार्यालये नवीन इमारतीत हलवण्याबाबत सुतोवाच केले आहे. मात्र, सध्या बांधकाम झालेल्या तीन मजल्यांवर सर्व कार्यालयांना जागा मिळू शकणार नाही. नाशिक जिल्हा परिषदेची सध्याची इमारत प्रशासकीय कामकाजासाठी अपुरी पडत असल्यामुळे २०१९ मध्ये नाशिक जिल्हा परिषदेच्या २५ कोटी खर्चाच्या नवीन प्रशासकीय इमारतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली. इमारतीच्या खर्चामध्ये वाढ होऊन तो ३९.६१ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला.

सातपूर मार्गावर पशुसंवर्धन विभागाच्या जागेत या इमारतीच्या प्रस्तावित सहा मजल्यांपैकी सध्या दोन तळ मजले तीन मजले यांचे बांधकाम पूर्ण झाले असून सध्या रंगकाम सुरू आहे. दरम्यान या इमारतीच्या उर्वरित तीन मजल्यांच्या बांधकामासाठीही ग्रामविकास विभागाने ४१.६७ कोटींची सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. दरम्यान काम पूर्ण झालेल्या तीन मजल्यांवर जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीमधील काही कार्यालये हलवण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियोजन सुरू केले असले तरी तिथे अद्याप फर्निचरच नसून त्यासाठीची आर्थिक तरतूदही झालेली नाही. या तीन मजल्यांवर शक्य तितक्या विभागांची कार्यालये सुरू करायची व साधारण दीड-दोन वर्षात उर्वरित तीन मजल्यांची कामे पूर्ण झाल्यानंतर उर्वरित कार्यालये तेथे स्थलांतरीत करण्याचे नियोजन असल्याची चर्चा आहे.





# राज्यपाल रमेश बैस यांनी घेतले श्री महाबळेश्वराचे दर्शन : पर्यटकांनबरोबर काढले फोटो

**- शुभम गुरव, क्षेत्र महाबळेश्वर**

राज्यपाल रमेश बैस हे नियोजित महाबळेश्वर दौर्यावर आहेत. आज सकाळी १० वाजता राज्यपाल रमेश बैस यांचे क्षेत्र महाबळेश्वर येथे आगमन झाले त्यानंतर त्यांनी क्षेत्र महाबळेश्वर येथील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र व ऐतिहासिक असलेल्या श्री महाबळेश्वर व श्री पंचगंगा मंदिराला सहकुटुंब भेट दिली. यावेळी त्यांनी श्री महाबळेश्वर महादेवाचे दर्शन घेत पुजा -अर्चा केली.व नद्यांचे उगमस्थान असलेल्या श्री पंचगंगा मंदिराला भेट गंगेचे दर्शन घेतले तसेच राज्यपाल रमेश बैस यांनी क्षेत्र महाबळेश्वर येथील पर्यटकांनबरोबर फोटो देखील काढले.यावेळी त्यांच्याबरोबर शासकीय विभागातील अधिकारी वर्ग उपस्थित होता. तसेच क्षेत्र महाबळेश्वर ग्रामपंचायतीचे सरपंच सुनिल बिरामणे, उपसरपंच कल्पना कदम, सदस्य, ग्रामसेवक प्रशांत रणपिसे व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# सांगली जिल्ह्यातील तलावांमध्ये केवळ १३ टक्केच पाणीसाठा

**सांगली :** जिल्ह्यातील ८३ पैकी ४४ छोटे-मोठे तलाव कोरडे पडले असून, उर्वरित तलावांमध्ये केवळ १३ टक्केच पाणीसाठा शिल्लक आहे. सांगली जिल्ह्याची टंचाईमध्ये तहान भागविणाऱ्या कोयना धरणात २५.४५ टक्के, तर वारणा धरणात ३५.१८ टक्के पाणी आहे. आता वरुण राजा वेळेवर बरसला, तरच या पाणीटंचाईतून दुष्काळग्रस्तांची सुटका होणार आहे.



जिल्ह्यात २०२३ च्या हंगामात पावसाचा लहरीपणा पाहायला मिळाला. काही ठिकाणी सरासरी, तर काही ठिकाणी सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. पुरेसा पाऊस झाला नसल्याने तलाव, धरणातही अपेक्षित पाणीसाठा झाला नाही. त्यात पिकांना काही पाणी सोडले होते. कोयना धरणात २६.७९ टीएमसी, म्हणजे २५.४५ टक्के, तर वारणा धरणात १२.०९ टीएमसी, म्हणजे ३५.१५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. आता धरणातील पाणीसाठा कमी झाला असून, जिल्ह्यातील तापमानाचा पारा ४० अंशांवर पोहोचला आहे. त्यामुळे पाण्याच्या बाष्पीभवनचा वेगही वाढला आहे. दररोज पाणीसाठा खालावत चालला आहे. अनेक जलसाठे कोरडे पडत आहेत.

जिल्ह्यात मोरना (ता. शिराळा), सिद्धेवाडी (ता. तासगाव), बसाप्पावाडी (ता. कवठेमहांकाळ), संख, दोडनाला (ता. जत) हे पाच मध्यम प्रकल्प असून, तिथे १ हजार ७६० दशलक्ष घनफूट पाणीसाठ्याची क्षमता आहे. सध्या केवळ ६२ दशलक्ष घनफूट पाणीसाठा म्हणजे ४ टक्केच आहे. छोट्या पाझर तलावांची ७८ संख्या असून, त्याची सहा हजार १५ दशलक्ष घनफूट पाणीसाठ्याची क्षमता आहे. या प्रकल्पात सध्या केवळ ९८३ दशलक्ष घनफूट पाणीसाठा असून, तो १६ टक्के आहे.

२५ तलाव कोरडे १९ तलावांत मृत पाणीसाठा

जिल्ह्यातील ८३ पाझर तलावांपैकी २५ तलाव कोरडे ठणठणीत असून, १९ तलावांमध्ये मृत पाणीसाठा आहे. आठ तलावांमध्ये २५ टक्क्यांवर पाणी असून, एका तलावामध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त पाणी आहे. ७५ टक्के पाणीसाठा खानापूर, कडेगाव, शिराळा तालुक्यांतील प्रत्येकी एका तलावाचा समावेश आहे. आटपाडी तालुक्यातील दोन तलाव टेंभू योजनेच्या पाण्यातून पूर्ण भरलेले आहेत.

**जिल्ह्यातील तलावांमधील पाणीसाठा**

तालुका - तलाव संख्या - पाण्याची टक्केवारी

तासगाव - ७ - १
खानापूर - ८ - १६
कडेगाव - ७ - ३६
शिराळा - ५ - १६
आटपाडी - १३ - ३३
जत - २७ - ०३
क. महांकाळ - ११ - १२
वाळवा - ३ - १३
मिरज - २ - १०
एकूण - ८३ - १३

**गतवर्षीच्या तुलनेत १२ टक्के कमी पाणीसाठा**

जिल्ह्यातील ८३ पाझर तलावांमध्ये १५ मे २०२३ रोजी एक हजार ९२९.७६ दशलक्ष घनफूट पाणीसाठा होता. टक्केवारीत म्हटले, तर २५ टक्के होता.

यावर्षी १५ मे २०२४ रोजी एक हजार ४५.३५ घनफूट पाणीसाठा असून, तो १३ टक्के आहे. दोन्ही वर्षांची तुलना केल्यास गतवर्षीपेक्षा यावर्षी चक्क १२ टक्के पाणीसाठा कमी आहे. मान्सून १५ जूनपर्यंत सांगली जिल्ह्यात येईल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे, म्हणजे महिनाभर पाणी पुरेल, असे नियोजन प्रशासनाला करावे लागणार आहे.

**जिल्ह्यात टँकरचे शतक**

**जिल्ह्यातील जत, आटपाडी, शिराळा तालुक्यांतील ८४ गावे आणि ६२९ वाड्या-वस्त्यांमधील एक लाख ९९ हजार २६४ लोकसंख्येला १०८ टँकरने पाणीपुरवठा होत आहे, तसेच परिसरातील तलाव कोरडे पडल्यामुळे ३७ हजार ८१५ पशुधनालाही टँकरच्या पाण्याचाच आधार आहे.**

# पश्चिम बंगालमध्ये राडा!

## भाजपाच्या महिला कार्यकर्त्याच्या मृत्यूनं तणाव

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या नंदीग्राम इथं भाजपा आणि तृणमूल काँग्रेस कार्यकर्त्यांच्या झटापटीत एका भाजपा महिला कार्यकर्त्यांचा मृत्यू झाला. त्याशिवाय ७ भाजपा कार्यकर्ते जखमी झाले. ही घटना २२ मे च्या रात्री नंदीग्रामच्या सोनचूरा भागात घडली. तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी धारदार शस्त्राने भाजपा कार्यकर्त्यांवर हल्ला केल्याचा आरोप आहे. या घटनेमुळे परिसरात दहशत पसरली असून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी केंद्रीय सुरक्षा दल तैनात करण्यात आलं आहे.

या हिंसक घटनेत महिला कार्यकर्त्याचा मृत्यू झाल्यानं भाजपाही आक्रमक झाली आहे. या घटनेविरोधात नंदीग्राम इथं भाजपा कार्यकर्त्यांनी निदर्शने केली. भाजपा कार्यकर्त्यांनी टायर जाळून रस्त्यावर फेकली. नंदीग्राम येथील अल्पसंख्याक बहुल भागात मतदानाच्या दिवशी केंद्रीय सुरक्षा दल तैनात करावं अशी मागणी भाजपानं केली. तर संबंधित हिसाचाराच्या घटनेतील दोषींवर कारवाई करू असं आश्वासन पोलिसांनी आंदोलक कार्यकर्त्यांना दिले.

या घटनेचं गांभीर्य पाहता केंद्रीय सुरक्षा दलाला परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी लाठीचार्जही करावा लागला. घटनेत सोनचूरा भागातील एका दुकानाला आग लावण्यात आली. त्याशिवाय अनेक दुकानांची तोडफोड झाली. टीएमसी समर्थकाचे दुकाने जाळल्याचा भाजपावर आरोप आहे. या घटनेनंतर भाजपा नेते शुभेंदु अधिकारी यांनी म्हटलं की, टीएमसीनं एससी समुदायातील ५६ वर्षीय महिलेची हत्या केली. तिच्या मुलालाही मारले. मी त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मतदानाच्या दिवशीही असाच प्रकार घडण्याची शक्यता पाहता केंद्रीय सुरक्षा दलाचे जवान तैनात करावेत असं त्यांनी मागणी केली.

तर भाजपाची अंतर्गत लढाई असून त्यातूनच एका महिलेला मारण्यात आलं. त्यानंतर त्याचा आरोप टीएमसीवर लावला जात आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपाचा पराभव होतोय त्यासाठी लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी अशाप्रकारचे आरोप केले जात आहेत असा पलटवार टीएमसी नेते सांतनु सेन यांनी भाजपावर केला. नंदीग्राममधील हिंसाचार हा टीएमसी नेते अभिषेक बॅनर्जी यांच्या चिथावणीखोर विधानामुळे झाला असा आरोप भाजपाने केला आहे.

**२००७ मध्ये झाला होता १४ जणांचा मृत्यू**

नंदीग्राम येथे १४ मार्च २००७ मध्ये पोलिसांच्या गोळीबारात १४ जणांचा मृत्यू झाला होता. त्यावेळी वाममोर्चा सरकारने विशेष कायद्यानुसार जमीन अधिग्रहण केले जात होते. त्याला स्थानिकांनी विरोध केला होता. त्या विरोधात ममता बॅनर्जी पुढे होत्या. या मोर्चानं हिंसक वळण घेताच पोलिसांनी गोळीबार केला. त्यात १४ मृत्यूमुखी पडले. या घटनेचा फायदा ममता बॅनर्जी यांना झाला आणि त्यांनी हळूहळू सत्तेच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले.

# गजानन कीर्तिकरांवर शिवसेनेकडून शिस्तभंगाची कारवाई होणार?

**मुंबई :** मुंबईतले शिंदे गटाचे विद्यमान खासदार गजानन कीर्तिकर (ऋक्षरपरप घळींळज्ञरी) यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. कीर्तिकरांवर पक्षांतर्गत कारवाई होण्याची शक्यता आहे. कीर्तिकरांनी मुलगा आणि ठाकरे गटाचे उमेदवार अमोल कीर्तिकर यांच्याबाबत मांडलेल्या भूमिकेनंतर शिवसेनेत नाराजी आहे. शिवसेनेच्या शिस्तभंग कमिटीकडे तक्रार अर्ज दाखल करण्यात आलाय. टर्निंग पॉईंटला आपल्या मुलासोबत नव्हतो याची खंत वाटते, असं गजानन कीर्तिकरांनी म्हटलं होतं.

गजानन कीर्तिकरांनी आपला मुलगा आणि मुंबई उत्तर पश्चिममधील ठाकरे गटाचे उमेदवार अमोल कीर्तिकरांबाबत वक्तव्य केलं होतं. शिवसेनेचे उपनेते शिशिर शिंदे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना पत्र लिहून गजानन कीर्तिकरांवर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी केली होती.

# पंतप्रधान मोदींनी लक्ष्मण रेषा ओलांडलीय

## लोकसभेची निवडणूक ग्रामपंचायतीसारखी करुन ठेवलीय : प्रकाश आंबेडकर



**नवी दिल्ली :** देशात लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी जडल्याचं दिसतंय. अशातच आता वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर) यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात पंतप्रधान मोदींनी लक्ष्मणरेषा ओलांडली आहे.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकरांनी इंग्रजी वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेसला मुलाखत दिली. यावेळी बोलताना त्यांनी अनेक मुद्द्यावर भाष्य केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लोकसभा निवडणुकीचं रुपांतर ग्रामपंचायत निवडणुकीत केलं असल्याचं प्रकाश आंबेडकरांनी मुलाखतीत बोलताना सांगितलं आहे.

इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, तत्कालीन पंतप्रधानांनी आपापल्या पक्षांचा प्रचार केला हे खरं आहे, मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकीचं रूपांतर ग्रामपंचायत निवडणुकीत केलं आहे. पंतप्रधान मोदी प्रत्येक लोकसभा मतदारसंघात प्रचार करतात आणि विधानसभा निवडणुकीतही तेच करतात. स्थानिक पातळीवरील निवडणुकीतही पंतप्रधान मोदी हेच करतात.

वंचित बहुजन आघाडी (तत-) महाराष्ट्रात ४८ पैकी ३ जागा जिंकेल, असा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. आम्ही ३८ जागांवर आमचे उमेदवार उभे केले आहेत. खरं तर महाराष्ट्रात महाविकास आघाडी आणि राष्ट्रीय पातळीवर इंडिया आघाडीमध्ये उद्धव ठाकरेंची शिवसेना, शरद पवारांची राष्ट्रवादी आणि काँग्रेस यांचा समावेश आहे. दुसरीकडे भाजप, एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आहे. राज्यात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी मुख्य लढत दोन आघाड्यांमध्ये आहे., असं प्रकाश आंबेडकर म्हणाले आहेत.

**प्रकाश आंबेडकरांचा पंतप्रधान मोदींवर घणाघात**

प्रकाश आंबेडकरांनी पंतप्रधान मोदींवर निशाणा साधला आहे. ते म्हणाले की, पंतप्रधान मोदी प्रचारादरम्यान वैयक्तिक हल्ले करत आहेत, जे अत्यंत वाईट आहे. पंतप्रधानांनी पंतप्रधान पदाची प्रतिष्ठा खालावली आहे. सत्ताधारी पक्ष केंद्रीय तपास यंत्रणेचा कसा वापर करतात, हे या निवडणुकीनं दाखवून दिलं आहे.

# दहावीच्या निकालाची प्रतीक्षा लवकरच संपणार

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून दहावीचा निकाल लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दहावीचा निकाल २७ मे पर्यंत जाहीर होईल असं म्हटलंय. यामुळं दहावीच्या निकालाबाबत विद्यार्थी आणि पालकांमध्ये निकालाची उत्सुकता निर्माण झाली आहे. बोर्डानं बारावीचा निकाल २१ मे रोजी जाहीर करण्यात आला आहे. आता दहावीच्या निकालाची विद्यार्थ्यांना प्रतीक्षा लागून राहिली आहे. दहावीचे विद्यार्थी ऑनलाईन निकाल ्रहीर्शीीश्रीं.पळल.ळप या वेबसाईटवर पाहू शकतात. याशिवाय दहावीचा निकाल डिजीलॉकरवर देखील पाहता येणार आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून दहावीची परीक्षा १ मार्च ते ६ मार्च दरम्यान आयोजित करण्यात आली होती. आता विद्यार्थ्यांना निकालाची उत्सुकता लागून राहिलेली आहे. महाराष्ट्रातील जवळपास १६ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. बोर्डाकडून येत्या काही दिवसांमध्ये दहावीचा निकाल जाहीर केला जाणार आहे. विद्यार्थी बोर्डाच्या निकालांच्या वेबसाईटसह डिजीलॉकरवर देखील निकाल पाहू शकतात.

# सरफरोश ते सरफरोश २

## प्रवास अनेक वैशिष्ट्यांचा....

मध्यंतर
दिलीप ठाकूर

का ही चित्रपट कलाकृती पडद्यावरून उतरल्या तरी त्या सतत 'फोकस'मध्ये असतात. आठवणीत राहतात. ते यशाचे परिमाण काही वेगळेच.

जॉन मॅथ्यूज मथान दिग्दर्शित 'सरफरोश' (मुंबईत रिलीज ३० एप्रिल १९९९) हा व्यावसायिक चौकटीचे भान ठेवून मनोरंजन करत साकारलेला चित्रपट असाच. गुलफाम हसन ( नसिरुद्दीन शहा) हा पाकिस्तानातील गझल गायक आपल्या गायकाच्या पेशाआड राहून भारत व पाकिस्तान यांच्यातील राजस्थानातील सीमाभागातून कशा पद्धतीने आधुनिक शस्त्रास्त्रांना आणण्याचा डाव रचतो आणि त्याच्या त्या हेतूत त्याला भारतातील वीरन (गोविंद नामदेव) सारखे काही गुन्हेगार सामील असतात आणि हे सगळे रॅकेट एसीपी अजयसिंग राठोड (आमिर खान) आपल्या टीमसोबत साहसाने उलथवून टाकतो. या थीमवरचा हा चित्रपट खूप गाजला. हिंदी चित्रपटात पहिल्यांदाच पाकिस्तानचा शत्रूराष्ट्र असा उल्लेख यात आला. अन्यथा शेजारी देश एवढेच म्हणता येत असे. हा बदल हे या चित्रपटाचे एक देणे.

'सरफरोश'ला पंचवीस वर्षं पूर्ण झाल्यानिमित्त मुंबईत आयोजित केलेल्या विशेष खेळास चित्रपटातील उपस्थित असलेले सगळेच लहान मोठे कलाकार एकदम भारावून गेल्यासारखे वाटले. माझ्या सुदैवाने मला पहिल्याच ए रांगेतील पाहुण्यांच्या रांगेतील पास मिळाल्याने हा सोहळा मी अगदी जवळून अनुभवत होतो. जयवंत वाडकरचा पुणे शहरात 'आज्जीबाई जोरात'चा प्रयोग असल्याने तो हजर नव्हता. पण त्याने सोशल मीडियात 'सरफरोश पंचवीशी'ची दखल घेतली. विशेष उल्लेखनीय गोष्ट, चित्रपटातील आज हयात नसलेले राजेश जोशी वगैरे कलाकार व तंत्रज्ञ यांना आठवणीने श्रद्धांजली वाहण्यात आली. मनोज जोशी मला भेटताच म्हणाला, मला आज माझा भाऊ राजेश जोशीची खूप आठवण येतेय. त्याचं भावनाविवश होणे स्वाभाविकच.

आमिर, नसिरुद्दीन शहा, सोनाली बेंद्रे, मुकेश रिशी यांनी दिलखुलासपणे सांगितलेल्या आठवणींच्या बातम्या वाचनीय झाल्या. या चित्रपटातील भूमिकेसाठी आपण केस बारीक ठेवायला हवे होते हे आमिर खानचे बोलणे अजूनही तो या भूमिकेचा विचार करतोय हेच सुचवणारे. या छोटेखानी सोहळ्याची रिल (रिल्स) सोशल मीडियात भरभरून लाइक्स मिळवणारी ठरली. स्मिता जयकर, सुकन्या मोने, मकरंद देशपांडे या सोहळ्यात अतिशय उत्साहात भेटले. सुकन्या मोनेची सोशल मीडियातील पोस्ट चक्क बातमी ठरली.



'रेडिओ नशा' यांनी या छोटासाच सोहळा आणि चित्रपटाचे स्क्रीनिंग आयोजित केलेले आणि त्यात महत्त्वाचे ठरले, 'सरफरोश २'ची अर्थात पुढच्या भागाची (सिक्वेल) चर्चा. काही वर्षांपूर्वीही या सिक्वेलची बातमी होतीच. आजचं आंतरराष्ट्रीय स्तरावरचे वातावरण विचारात घेऊन हा 'पुढचा भाग' रेखाटावा लागेल. याचं कारण, आजच्या ग्लोबल युगात एकीकडे हिंदी चित्रपट जगभरातील अनेक देशांत प्रदर्शित होत आहेत, तर दुसरीकडे भारत व पाकिस्तान यांच्यातील राजनैतिक संबंधाचा विचार करून पटकथा रचावी लागेल. दरम्यान, पंचवीस वर्षांत मुंबईतील लोकल ट्रेनमधील बॉम्बस्फोट, तसेच २६/११ चा दहशतवादी हल्ला, यासाठी जलवाहतूक मार्गाने आलेले आधुनिक शस्त्रास्त्रधारी दहशतवादी या सगळ्याचाच कथाआशयात समावेश करावा लागेल. चित्रपट वास्तववादी होईल. सेन्सॉरही त्यातील दृश्य, संवाद, संदर्भ यांना कात्री लावणार नाही.

देशभक्तीवरील चित्रपटाच्या परंपरेत 'सरफरोश' हा त्या काळात पुढचा टप्पा होता (तोपर्यंत चित्रपटातील देशभक्ती महंगाई मार गई, देशभक्तीवरील टाळीबाज जोरदार डायलॉगबाजी, काश्मीरमधील दहशतवाद आणि नायकाने केलेला त्याचा पाडाव असेच चौकटीतील असे. प्रेक्षकही त्या मनोरंजनात रमत. त्यांचीही माफक अपेक्षा असे.) 'सरफरोश २' हा आंतरराष्ट्रीय दहशतवादाची पाळेमुळे खणून त्यातील लहान लहान संदर्भ दाखवणारा असावा.

एखाद्या चित्रपटाची पंचवीस वर्षं जुन्या आठवणीत नेते. एक वेगळाच फ्लॅशबॅक ठरतो.

शेखर कपूर दिग्दर्शित 'बॅण्डिट क्वीन', रामगोपाल वर्मा दिग्दर्शित 'सत्या', जे. पी. दत्ता दिग्दर्शित 'बॉर्डर', गुलजार दिग्दर्शित 'माचिस' आणि जॉन मॅथ्यूज मथान दिग्दर्शित 'सरफरोश' हे नव्वदच्या दशकाच्या उत्तरार्धातील वेगळ्या प्रकारचे 'टॉप फाइव्ह' चित्रपट. वेगळ्या भाषेत सांगायचं तर, व्यावसायिक चित्रपट व कलात्मक चित्रपट यातील अंतर या चित्रपटांनी बरेच कमी केले. 'सरफरोश' पंचविशीत हा खास उल्लेख हवाच.



# पोकेमॉनची नवी सीरिज प्रीमिअर हंगामावर २५ मे रोजी प्रसारित होणार

'राष्ट्रीय' - पोकेमॉन कंपनीने 'पोकेमॉन हॉरिझॉन द सीरिज' ही नवीन सीरिज हंगामावर २५ मे रोजी आणण्याची घोषणा केली आहे. यासंबंधी पत्रकार परिषद मुंबईतील जुहू येथील जे डब्ल्यू मॅरियट हॉटेलमध्ये घेण्यात आली. त्यात ओरिजिनल ओपनिंग आणि एंडिंग साऊंडट्रॅकचे अनावरण करण्यात आले. प्रसिद्ध संगीतकार विशाल-शेखर यांनी हे साऊंडट्रॅक तयार केले आहेत. अरमान मलिक आणि शिरले सेटिया यांचा आवाज आहे. यामुळे या शो ला स्थानिक फ्लेवर साज आला आहे.

या नवीन सीरिजमध्ये खिळवून ठेवणाऱ्या गोष्टीबरोबरच नवीन पात्रं घालण्यात आली आहेत. त्यात एअरशिपचं नेतृत्व करण्यासाठी कॅप्टन पिकाचूला पाचारण करण्यात आले आहे. पहिल्यांदाच भारतीय कलाकार आणि पोकेमॉन कंपनीने मिळून ही कलाकृती तयार केली आहे. ओपनिंग आणि क्लोझिंग ट्रॅकमुळे पोकेमॉन सीरिजला एक स्थानिक साज मिळाला आहे आणि ही विशेषतः भारतीय प्रेक्षकांसाठी तयार करण्यात आली आहे.

यामुळे या ब्रँडचा भारतात करमणूक क्षेत्रात पाय रोवण्याच्या तयारीचा प्रत्यय येतो. या चालींनी बालपण टिपलं आहे आणि त्यामुळे अतिशय आनंददायी झाल्या आहेत.

पोकेमॉन कंपनीबरोबर केलेल्या या कामाबद्दल बोलताना विशाल आणि शेखर म्हणतात, "जेव्हा आम्हाला पोकेमॉन कंपनीकडून काम करण्यासाठी फोन आला तेव्हा अतिशय आनंद झाला. आम्ही ब्रँडची ओळख असलेल्या, त्यात भरपूर आनंद आणि अँडव्हेंचर असलेल्या चाली आम्ही रचल्या. आपल्या स्थानिक प्रेक्षकांना आवडावं यासाठी त्याला एक भारतीय चेहरा दिला. आम्हाला आशा आहे की जेव्हा लोक टीव्हीपासून दूर असतील तेव्हाही त्यांना या ॲनिमेटेड सीरिजची चाल आठवत राहील."

अरमान मलिकही या कार्यक्रमाला उपस्थित होता. तो म्हणाला, "लहानपणी मी पोकेमॉन कार्ड्स खेळायचो. एक दिवशी याच सीरिजचं टायटल साँग हिंदी, तामिळ आणि तेलुगूमध्ये मला गायला मिळाले हे सगळं स्वप्नवत आहे. जेव्हा मी लहान होतो तेव्हा पोकेमॉन पाहणे ही एक प्रथाच पडली होती. त्यामुळे हॉरिझॉन सीरिजसाठी त्याला आवाज देणे हा माझ्यासाठी फक्त सन्मानच नाही तर आयुष्याचं एक वर्तुळ पूर्ण झालं आहे असं मला वाटतं. विशाल-शेखरने पोकेमॉनचा जागतिक पातळीवर असलेला प्रभाव ओळखून काही पारंपरिक आवाजही त्यात घातले आहे. ही चाल सगळ्या पिढ्यांना आपलीशी वाटेल अशी आहे. नाविन्य आणि नॉस्टॅलजिया यांचा संगम असलेल्या या सीरिजचा सगळ्यांनी आस्वाद घ्यावा याची मी आतुरतेने वाट पाहतो आहे.

शिरले सेटियानेही याप्रसंगी तिची प्रतिक्रिया व्यक्त केली. ती म्हणाली, "आपल्या बालपणाचा अविभाज्य भाग असलेल्या एखाद्या गोष्टीवर काम करणं हा सन्मानच आहे. मला पोकेमॉनचे सॉफ्ट टॉय आणि इतर वस्तू विकत घेणं मला आधीही आवडायचं आणि आताही आवडतं. या सीरिजसाठी गाणं हा माझ्यासाठी अतिशय अविश्वसनीय अनुभव होता. या चालीचा फॅन्सवर दीर्घकाळासाठी प्रभाव पडेल असं मला वाटतं.

या गाण्याचे गीतकार रश्मी आणि विराग म्हणाले, "पोकेमॉन शो साठी गाणी लिहिणं म्हणजे हा शो आमच्या मुलीबरोबर पुन्हा पाहिल्यासारखं वाटतं. आमच्या या गाण्यातून मुलांना आनंद मिळावा असं आम्हाला वाटतं."

# व्ही मोशन पिक्चर्स प्रस्तुत 'मल्हार' येतोय भेटीला

व्ही मोशन पिक्चर्स प्रस्तुत 'मल्हार' या नव्या चित्रपटाची घोषणा करण्यात आली असून या चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित झाले आहे. ३१ मे २०२४ रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हा चित्रपट मराठी आणि हिंदी दोन्ही भाषेत प्रदर्शित होणार आहे.

'मल्हार'चे पोस्टर आणि शीर्षकाची झलक पाहून प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली असेल! ही कथा गुजरात प्रदेशामधील कच्छच्या ग्रामीण भागात घडत असून तीन वेगवेगळ्या कथा येथे घडताना दिसणार आहेत. ज्या एकमेकांशी संबंधित आहेत. पोस्टर



पाहून प्रेक्षकांमध्ये चित्रपटाबद्दल नक्कीच उत्सुकता निर्माण झाली असेल, याची खात्री आहे.

'मल्हार'चे निर्माते प्रफुल्ल पासड असून या चित्रपटात अंजली पाटील, शारीब हाश्मी, ऋषी सक्सेना, बालकलाकार श्रीनिवास पोकळे, विनायक पोद्दार, मोहम्मद समद, अक्षता आचार्य आणि रवी झंकाल प्रमुख भूमिकेत दिसत आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन विशाल कुंभार यांनी केले आहे.

या चित्रपटाबद्दल दिग्दर्शक विशाल कुंभार म्हणतात, "हा चित्रपट गावाकडील अनेक विषयांवर आधारित असून यात अनेक पात्रांचा समावेश आहे. प्रत्येक पात्राची एक वेगळी कथा आहे. मैत्री, प्रेम, विश्वास अशी भावनात्मक जोड प्रेक्षकांना यात बघायला मिळेल. त्यामुळे प्रेक्षकांसाठी हा एक नवा अनुभव असेल असे म्हणायला हरकत नाही. 'मल्हार'ला प्रेक्षक पसंती दर्शवतील याची मला खात्री आहे."

# शिवानी सुर्वे पुन्हा येतेय



देवयानी मालिकेमुळे महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचलेली अभिनेत्री शिवानी सुर्वे नव्या रूपात प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. स्टार प्रवाहची नवी मालिका 'थोडं तुझं आणि थोडं माझं' या मालिकेतून शिवानी तब्बल ९ वर्षांनंतर स्टार प्रवाहच्या मालिकेत दिसणार आहे. या मालिकेत ती मानसी सणस ही व्यक्तिरेखा साकारणार आहे. शिवानी या मालिकेत ९ वर्षांनंतर काम करण्यास उत्सुक आहे. ती म्हणाली, स्टार प्रवाह कुटुंबासोबत पुन्हा एकदा जोडली जातेय याचा आनंद आहे. स्टार प्रवाहाच्या मालिकांचे विषय, त्यांची मांडणी मला भावते. त्यामुळेच 'थोडं तुझं आणि थोडं माझं' या मालिकेसाठी मी लगेच होकार दिला. मानसी हे पात्र मला अतिशय आवडलं. या भूमिकेसाठी प्रेक्षकांचे भरभरून प्रेम मिळेल अशी आशा आहे. 'थोडं तुझं आणि थोडं माझं' ही मालिका स्टार प्रवाह वाहिनीवरून लवकरच प्रसारित होणार आहे.

# जुने रितीरिवाज आणि आधुनिक विज्ञान यांच्यातील संघर्षावर भाष्य करणारा लाईफलाईन

क्रिसेंडो एंटरटेन्मेंट निर्मित, ११ आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त 'लाईफलाईन' या आगामी मराठी चित्रपटाची नुकतीच सोशल मीडियावरून घोषणा करण्यात आली असून पोस्टरची झलक आणि शीर्षक पाहता विषयाची उत्सुकता निर्माण होते यात शंकाच नाही. आधुनिक विज्ञान आणि जुन्या रितीरिवाजांचा संघर्ष अशी संकल्पना असणाऱ्या या चित्रपटात लोकप्रिय अभिनेते माधव अभ्यंकर आणि महाराष्ट्रभूषण पुरस्कार प्राप्त महानायक अशोक सराफ प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. सोबतीला हेमांगी कवी, भरत दाभोळकर, जयवंत वाडकर, शर्मिला शिंदे, संध्या कुटे आणि समीरा गुजर अशी तगड्या कलाकारांची फौज आहे. साहिल शिरवैकर दिग्दर्शित 'लाईफलाईन' या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद आणि गीत राजेश शिरवैकर यांचे आहेत. अशोक पत्की यांनी संगीतबद्ध केलेल्या गीतांना अवधुत गुप्ते आणि माधुरी करमरकर यांचा आवाज लाभला आहे, तर लालजी जोशी, कविता शिरवैकर, मिलिंद प्रभुदेसाई, संध्या कुलकर्णी, अमी भुता, संचीता शिरवैकर, उदय पंडित, शिल्पा मुडबिद्री 'लाईफलाईन'चे निर्माते आहेत. लवकरच हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

'लाईफलाईन'चे तरुण दिग्दर्शक साहिल शिरवैकर म्हणतात, "सामाजिक भान आणि व्यावसायिक मूल्यं राखून हा चित्रपट आम्ही बनवलेला आहे. विधात्याने रेखाटलेली तळहातावरची 'आयुष्य रेखा' आपण वाढवू शकतो का? या प्रश्नाचं उत्तर शोधण्याचा प्रयत्न आम्ही या चित्रपटातून केलेला आहे. अनोखी कथा, अनोखा संघर्ष, अनोखी मांडणी, अनोखी पात्रनिवड आणि तगड्या कलाकारांच्या अभिनयाची जुगलबंदीही या चित्रपटाची वैशिष्ट्यं म्हणता येतील. बाकी अशोक सराफ सर चित्रपटांच्या निवडीबाबत किती चोखंदळ असतात हे सर्वांना माहीत आहेच. त्यांनी आमचा चित्रपट स्वीकारला म्हणजे विषय संपला."

# वाढदिवशी अमोलला मिळेल का बाबांची भेट?

'अप्पी आमची कलेक्टर' मालिकेत प्रेक्षकांना अमोल आणि अर्जुनचं नातं फुलत असताना पाहायला खूप आवडत आहे. जसजशी मालिका पुढे सरकतेय तशी त्या दोघांची मैत्री ही मजबूत होताना दिसत आहे. अमोलशी बोलल्याने अर्जुनच्या मनातील कडवटपणा कमी होऊ लागलाय आणि तो अप्पीला एक संधी देण्याचं ठरवतो. त्यासाठी अर्जुन अप्पीच्या घरी भेटीला गेला असता त्याला तिकडे आलेले सरकार आणि रुक्मिणी दिसतात आणि त्याची तळपायाची आग मस्तकात जाते. अप्पी अजूनही तशीच आहे हे कळताच तो मागे फिरतो. इकडे अमोलचा वाढदिवस जवळ आला आहे आणि अप्पीची इच्छा आहे की अर्जुनला अमोलच्या वाढदिवसाला बोलवावं. ती त्यासाठी तयारी करते आणि गायतोंडेला अर्जुनची माहिती काढायला सांगते. अर्जुन आणि अमोलची मैत्री वाढत चालली आहे. अमोल आईने दिलेला डब्बा अर्जुनला खायला लावतोय आणि स्वतः आवडीच चायनीज, पिझ्झा आणि बर्गर खातो. अर्जुन त्याचे सगळे लाड पुरवतोय. अमोलच्या वाढदिवशी मात्र अप्पी अमोलला त्याच्या बाबांबद्दल सगळं सांगते, तो कसा होता? त्यांचं नातं कसं होतं? पण अप्पी, अमोलला वाढदिवसाला अर्जुनच त्याचा बाबा आहे हे सांग शकेल?

# सूर्यकांत कदम परत येतोय

झी वाहिनीवरून प्रसारित होणारी 'पारू' ही मालिका प्रेक्षकांना आवडू लागलेली आहे. आता या मालिकेत भरत जाधव एंट्री घेणार आहे. तो सूर्यकांत कदम हा खलनायक साकारणार आहे. त्याचा लूक खतरनाक आहे. ती व्यक्तिरेखा जितकी खतरनाक




आहे तितकीच ती जबरदस्त आहे. विशेष म्हणजे भरत जाधव ती करतोय यामुळे सूर्यकांत कदमला महत्त्व आले आहे. सध्या त्याचा प्रोमो झी मराठी वाहिनीवरून सारखा दाखवला जातोय. म्हणूनच सूर्यकांत कदमला पाहण्याची उत्सुकता सर्वांना आहेच. 'पारू' ही मालिका झी मराठी वाहिनीवरून सायंकाळी ७.३० वाजता प्रसारित होतेय.

# नाट्यकलेचा जागर महोत्सव



नाट्यरंग
संजय कुळकर्णी

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या १०० व्या नाट्य संमेलनाच्या निमित्ताने महाराष्ट्रातून अनेक उपक्रमांचे स्पर्धात्मक आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाच्या निमित्ताने रंगकर्मीयांत एक ऊर्जा निर्माण व्हावी आणि नाट्य चळवळ वृद्धिंगत व्हावी हाच उद्देश नाट्य परिषदेचा होता. प्रशांत दामले हा अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा अध्यक्ष झाल्यापासून नाट्य परिषदेत एक नवचैतन्य आलेले आहे. तो देखील झपाटल्यासारखा काम करताना दिसत आहे. यशवंत नाट्यगृह सुरू करताना १४ जून हा दिवस त्यानं जाहीर केला होता. त्याचं उद्घाटन त्याच वेळी, त्याच दिवशी झालं. आता पुन्हा ते काही महत्त्वाच्या कामासाठी बंद आहे. नव्यानं वातानुकूलित यंत्रणा आणि काही डागडुजीचे काम सुरू आहे. ते पूर्णत्वास झाल्यावर ३ जून रोजी ते नाटकांसाठी पूर्ववत सुरू होत आहे.

१०० व्या नाट्य संमेलनाचे औचित्य साधून महाराष्ट्रात नाट्यछटा, एकपात्री, नाट्य अभिवाचन, नाट्य संगीत पद गायन, बालनाट्य आणि एकांकिका अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तो एकप्रकारचा नाट्यकलेचा जागर महोत्सवच. स्पर्धेला महाराष्ट्रातून अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला. २८९ एकांकिका, २५४ बालनाट्य, ६८१ एकपात्री, ४३६ नाट्यछटा, २०५ नाट्य अभिवाचन आणि २३८ नाट्य संगीत पद गायन अशा स्पर्धकांनी भाग घेतला. उपांत्य फेरी पार पडून त्यांची अंतिम फेरी मुंबईत होत आहे. या स्पर्धेचे वैशिष्ट्य हे की मुंबईपेक्षा महाराष्ट्रातील उर्वरित रंगकर्मींनी आपला जास्त सहभाग नोंदविला. याचाच अर्थ नाट्य चळवळ महाराष्ट्रात जास्त होताना दिसत आहे. एकांकिका स्पर्धेचे आकर्षण जास्त असल्याचे दिसून आले. याला तसं कारण आहे. या स्पर्धेला केवळ या नाट्य जागरसाठी लिहिलेल्या प्रथम पारितोषिक संपादन करणाऱ्या एकांकिकेस २ लाखांचे पारितोषिक आहे. तसेच १ लाख, ७५ हजार, ५० हजार आणि २५ हजार अशी भरघोस रकमेची पारितोषिकं ठेवण्यात आलेली आहेत. ज्या एकांकिकांची अंतिम फेरीसाठी निवड झालेली आहे त्यांच्या एकांकिकांसाठी ९ मार्गदर्शक नेमलेले आहेत. नीरज शिरवईकर (अनपेक्षित, बुलढाणा), मंगेश कदम (वाटसरू, पुणे), संतोष पवार (सिनेमा, पुणे), राजेश देशपांडे (निर्झर, कोल्हापूर), विजय केंकरे (नवस, बीड), कुमार सोहोनी (अ डील, नाशिक), अद्वैत दादरकर (उर्मिलायण, अहमदनगर), चंद्रकांत कुलकर्णी (व्हॉट्सअप, मुंबई) आणि विजू माने (नारायणास्त्र, विरार) या मार्गदर्शकांची सुद्धा एकप्रकारची स्पर्धा असेल हे त्यातून समजतंय. त्यामुळे प्रत्येक एकांकिका हे तुल्यबळ असेल यात शंकाच नाही. त्यामुळे अंतिम फेरी पाहण्यासाठी रंगकर्मींत उत्सुकता आहे.

या नाट्य जागर अंतर्गत महोत्सवात नाट्यछटा स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी एक परीक्षक म्हणून त्या पाहण्याचा योग आला. पाहताना एक जाणवलं की महाराष्ट्रातून आलेल्या स्पर्धकांची सादरीकरणातील ऊर्जा स्पष्टपणे जाणवली. हेच उद्याचे व्यावसायिक आणि प्रायोगिक रंगभूमीचे कलावंत असतील. त्यांना योग्य ते मार्गदर्शन मिळायला हवंय. त्यासाठी नाट्य परिषदेने पुढाकार घेऊन त्यांच्यातील गुणवत्तेला उभारी देणं गरजेचं आहे. पाच ते सात मिनिटांच्या नाट्यछटेतून त्यांनी मांडलेला विषय आमच्यापर्यंत पोहचला. या नाट्यछटेतून सर्वोत्कृष्ट एकांकिकेची पारितोषिकांसाठी निवड करताना जरा कठीण गेलं हे नाकारून चालणार नाही. महाराष्ट्रातील छोट्या छोट्या शहरातून ते आपली नाट्यकला जोपासताहेत हे गौरवपूर्ण आहे. केवळ या स्पर्धेमुळे त्यांना आपली कला सादर करता आली. या नाट्य जागर महोत्सवाचे प्रमुख डॉ. अनिल बांदिवडेकर आणि त्यांच्या टीमच्या परिश्रमाचे कौतुक करणं क्रमप्राप्त आहे. ५ जूनला एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी पाहण्यासाठी यशवंत नाट्य मंदिरात भव्य प्रतिसाद मिळेल.

# ऐतिहासिक महत्व असलेल्या कोडोली जि. प. शाळेच्या पुनरुत्थानासाठी घेऊ पुढाकार

शिक्षणाचे आणि ज्ञानाचे महत्त्व देशभरात पोहोचविणाऱ्या या महाराष्ट्राच्या एकेकाळीच्या साताराजवळ कोडोली या गावी मेजर पांडुरंगराव रामचंद्रराव जाधव यांनी देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच अनेक वर्ष स्वतःची सहा एकर जमीन दान देऊन या जागेवर मुला-मुलींसाठी एकत्रित शाळा उभी केली.

कोडोली हे गावच जाधव घराण्याने वसविले. अर्थातच गावचे पाटील म्हणून त्याचे पालकत्वही या घराण्याकडे आले. मेजर जाधव हे इंग्रजांच्या सैन्यात मोठ्या हुद्द्यावर काम केलेले अधिकारी होते. मुठभर इंग्रज आपल्या बुद्धीचातुर्याच्या जोरावर जग पादाक्रांत करतात. इतकेच नव्हे तर जगावर राज्य करतात, यामागील कारणांचा मेजर जाधव यांनी बारकाईने मागोवा घेतला. इंग्रज जगाच्या पाठीवर कुठेही असले तरी त्यांच्या घरातील महिला सुशिक्षित असतात. पर्यायाने त्यांच्या घरातील मुलांना दर्जेदार शिक्षणाचे बाळकडू मिळते आणि ज्ञानाचा ध्यासही त्यांच्यामध्ये उत्पन्न होतो, ही बाब मेजर जाधव यांच्या ध्यानात आली.

अशीच शिक्षणाची संधी आपल्या भागातील मुलांना उपलब्ध व्हावी, त्यांच्यातही ज्ञानसंवर्धनाची आस निर्माण व्हावी, यासाठी मेजर जाधव यांनी आपली जमीन देऊन शाळा सुरु केली. ज्या काळात मुलींना आपल्या घराचा उंबरठा ओलांडण्यासही मज्जा होता, त्या काळात मुला मुलींना एकत्रित शिक्षण देणारी शाळा सुरु करणे ही एक प्रकारची क्रांतीच म्हटली पाहिजे. या शाळेचे स्थापना वर्ष सन 1904 हे होते एवढे सांगितले तरीही त्या कालच्या सामाजिक आणि शैक्षणिक परिस्थितीची जाणीव झाल्याशिवाय राहणार नाही.

कालांतराने मेजर जाधव यांची मुले, नातू व अन्य कुटुंबीय चरितार्थासाठी वेगवेगळ्या ठिकाणी विखुरले गेल्यामुळे शाळेच्या कारभारात लक्ष देण्यासाठी त्यांना उसंत मिळाली नाही. या शाळेचा कारभार जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत गेला. त्यानंतर मात्र विविध कारणाने या ऐतिहासिक महत्त्व असलेल्या शाळेची अधोगतीच सुरु झाली.

तब्बल सहा एकराचे आवार, 30 वर्गखोल्या, बाराशे विद्यार्थी क्षमता असलेली जिल्हा परिषदेची महाराष्ट्रातील ही एकमेव शाळा आहे. मात्र, सध्याच्या काळात या शाळेतील पटसंख्या घटली असून ती साडेआठशेवर आली आहे. ग्रामीण






कै. मेजर पांडुरंगराव रामचंद्रराव जाधव
जन्म : ५ जानेवारी १८८०
मृत्यू : १९ जानेवारी १९३९

भागातील लोकांची ही आर्थिक प्रगती झाल्यामुळे आणि शिक्षणाचे महत्त्व अधिक प्रमाणात उमजल्यामुळे अनेक पालक आपल्या पाल्यांना जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकवण्याऐवजी नावाजलेल्या खाजगी शाळांमध्ये शिकवणी पसंत करीत आहेत. अर्थातच, ग्रामीण भागातील सर्वच पालकांना खाजगी शाळा परवडणे शक्य नाही. त्यामुळेच या शाळेत आजही साडेआठशे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

गरीब कुटुंबातील मुलांना शिक्षणाची अधिक गरज असते. त्यासाठी त्यांची तळमळ अधिक असते, गुणवत्तेचीही कमतरता नसते. त्यामुळेच या शाळेतील विद्यार्थी शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा इतकेच काय राज्य आणि केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेत यश मिळवून मोठ्या अधिकार पदावर रुजू झाली आहेत, असे या शाळेचे संस्थापक मेजर जाधव यांचे पणतू संग्रामसिंह विजयसिंह जाधव हे सांगतात.

प्रत्यक्षात एवढी मोठी परंपरा आणि इतिहास असलेल्या या शाळेच्या पदरी प्रशासकीय पातळीवरुन उपेक्षाच येत आहे. एवढे मोठे आवार आणि क्रीडांगण लाभलेल्या या शाळेच्या जागेवर चहूबाजूंनी अतिक्रमण झाले आहे. संग्रामसिंह जाधव यांनी पुढाकार घेऊन यातील काही अतिक्रमण काढून घेण्यास भाग पाडले. मात्र कित्येक वर्षात शाळेच्या जागेची मोजणीच झालेली नाही. त्यामुळे शासनाने या जागेची मोजणी करुन घ्यावी आणि अतिक्रमणे काढून शाळेच्या ताब्यात संपूर्ण जमीन द्यावी, अशी मागणी जाधव यांनी केली आहे.

गोरगरिबांच्या या शाळेत शिकणाऱ्या साडेआठशे मुलांच्या भवितव्याचा विचार करुन संग्रामसिंह जाधव यांनी या ऐतिहासिक शाळेला महाराष्ट्रातील एक दर्जेदार शाळा म्हणून नावारुपाला आणण्याचा चंग बांधला आहे. आपल्या व्यवसायाची जबाबदारी आपले चिरंजीव आणि सूनबाई यांच्यावर सोपवून त्यांनी पूर्णवेळ शाळेच्या प्रगतीसाठी देण्याचा निर्धार केला आहे.

आर.सी.सी. इमारतीच्या छताची गळती दूर करावी, विद्यार्थ्यांसाठी नवीन बाके खरेदी करावी, मुला मुलींसाठी स्वच्छ, सुसज्ज प्रसाधनगृहे असावी, शाळेसमोर राज्य महामार्ग असल्याने विद्यार्थयांना सुरक्षितपणे ये जा करण्यासाठी स्काय वॉक असावा, रस्त्यावर गतिरोधक आणि शाळा असल्याचा दिशादर्शक फलक असावा, प्रवेशद्वारासमोर गटारे बंदिस्त करावी,

शाळेसाठी अद्ययावत विज्ञान प्रयोगशाळा, सांगणक कक्ष, ग्रंथालय, आभासी वर्ग, स्वयंपाक करण्यासाठी शेड, क्रीडा साहित्य ठेवण्यासाठी खोली, सांस्कृतिक सभागृह यासाठी 6 खोल्या असाव्या, सुरक्षेसाठी सीसी टीव्ही यंत्रणा असावी, कुंपण भिंतीची उंची वाढवावी, बंदिस्त व्हरांडे असावे, सुसज्ज संगणक प्रशिक्षण कक्ष व स्वतंत्र प्रशिक्षक असावा, विविध विषयांचे शिक्षक, कला, क्रीडा, कौशल्य प्रशिक्षक यांची रिक्त पदे त्वरित भरावी, क्रिडांगणावर 400 मीटर धावण्याचा ट्रॅक उभारावा, क्रीडासाहित्य उपलब्ध व्हावे, अशा अत्यंत न्याय्य मागण्यांचे निवेदन संग्रामसिंह जाधव यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्याधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांना दिले असून त्याचा नियमित पाठपुरावाही सुरु आहे. मात्र, अन्य तातडीच्या कामांमुळे प्रशासनाला गोरगरीब विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविणाऱ्या या कामाकडे लक्ष देण्यास वेळ नसल्याची खंत ते व्यक्त करतात. त्यामुळे जाधव यांच्या या कार्याला केवळ सातारकरच नव्हे तर शिक्षणाची आच असणाऱ्या आणि भावी पिढीच्या भवितव्याची काळजी असणाऱ्या प्रत्येकाने साथ देणे आवश्यक आहे.

**छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या वास्तव्याने पावन झालेल्या सातारा आणि परिसराला ज्याप्रमाणे समृद्ध असा ऐतिहासिक वारसा आहे त्याचप्रमाणे पुरोगामी विचारांचाही मोठा वारसा आहे. इथल्या माणसांच्या मनामनात आणि मातीच्या कणाकणात पुरोगामी विचार रुजला आहे. याच पुरोगामी विचाराच्या प्रभावाची साक्ष देणारी ऐतिहासिक महत्त्व असलेली एक वास्तू म्हणजे कोडोली येथील जिल्हा परिषदेची शाळा! महाराष्ट्रातील सर्वात जुनी आणि सर्वात मोठी जिल्हा परिषदेची शाळा असूनही आज या शाळेला उपेक्षेला सामोरे जावे लागत आहे. या शाळेला गतवैभव प्राप्त व्हावे यासाठी शाळेच्या संस्थापकांचे वंशज पोटतिडकीने करीत असलेल्या प्रयत्नांना सुजाण सातारकरांनी नेटाने साथ देणे गरजेचे आहे.**




**श्री. एस. व्ही. जाधव**
उद्योजक


## जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा कोडोली



### ITS, MTS आणि अभिरूप स्पर्धा परीक्षा २०२४ मधील गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन


शिवम कदम (200/200) राज्यात पहिला


तन्मय शिंदे (200/200) राज्यात पहिला


श्लोक साळुंखे (200/200) राज्यात पहिला


आराध्या घाडगे (198/200) राज्यात दुसरी



रिशांक जाधव (198/200) राज्यात दुसरा


आराध्या जाधव (198/200) राज्यात दुसरी


आरोही जाधव (198/200) राज्यात दुसरी


प्राथ्वी जमदाडे (198/200) राज्यात दुसरी


अंकित जाधव (196/200) राज्यात तिसरा


अद्युत लोकरे (192/200) राज्यात पाचवा


निरंजन घोरपडे (192/200) राज्यात पाचवा


सत्यजित साबळे (192/200) राज्यात पाचवा


श्रीनिका कुंभार (188/200) जिल्ह्यात दुसरी


सार्थक जाधव (190/200) जिल्ह्यात प्रथम


गौरवी जाधव (190/200) जिल्ह्यात प्रथम


साईराज सस्ते (190/200) जिल्ह्यात प्रथम


गायत्री पवार (184/200) जिल्ह्यात चौथी


रुद्र कोरडे (184/200) जिल्ह्यात चौथा


आरव जाधव (184/200) जिल्ह्यात चौथा


आराध्या साळुंखे (176/200) जिल्ह्यात आठवी


आराध्या भोसले (176/200) जिल्ह्यात आठवी


तन्वी तांगडे (174/200) जिल्ह्यात नववी


नवमी मुंढे (172/200) जिल्ह्यात दहावी


राजलक्ष्मी चव्हाण (172/200) जिल्ह्यात दहावी


तोसिफ मुलाणी (170/200) केंद्रात पहिला


सायली दिवटे (170/200) केंद्रात दुसरी


असीम पठाण (164/200) केंद्रात चौथा


दिव्या साखरे (164/200) केंद्रात चौथी


वेदिका चव्हाण (162/200) केंद्रात पाचवी



मार्गदर्शक शिक्षक
**श्री. सूर्यकांत देशमुख सर**

**इयत्ता १ ली प्रवेश सुरु...** यादव मॅडम (९४२३३५५६३५), साळुंखे मॅडम ७५५८५४८७७३, कुंभार मॅडम ९५११२०२३६८

**शुभेच्छुक :** अशोक जांभळे (मुख्याध्यापक), मनिषा साळुंखे (अध्यक्ष), उषा जाधव(उपाध्यक्ष), शिवाजी जाधव (लालासर)

## शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व सर्व पालक, दत्तनगर, कोडोली.